





मांडणी शिल्प स्पर्धेत लवली युनिव्हर्सिटी पंजाबच्या पियुश, रविकुमार, शुभम, गुरकीरने प्लॅस्टिकच्या टाकाऊ बाटल्या, चपला, कागद यांच्यापासून ड्रिमवर्ल्ड साकारून शांतीचा संदेश दिला. दुसऱ्या छायाचित्रात सोलापूर विद्यापीठाच्या ओंकार साठे, संगमेश्वर बिराजदार, प्रदिप भद्रशेटे, विक्रमसिंह चौहान यांनी टाकाऊ वस्तूपासून तयार केलेला सैनिक व तिरंगा. तिसऱ्या छायाचित्रात एकांकिका सादर करताना संत गाडगेबाबा विद्यापीठ अमरावतीचे विद्यार्थी.



युवा महोत्सवात सुगम संगीत स्पर्धेत गझल गाताना एसएनडीटी विद्यापीठ मुंबईची भाग्यश्री टीकले.

# विद्यापीठात रंगली रंग सुरांची मैफल

कोल्हापूर : शिल्प, चित्र, संगीत, नाटक या कलांच्या माध्यमातून युवामहोत्सवात रविवारी विद्यार्थ्यांनी समाजातील वास्तव मांडले. कल्पकतेने निवडलेले विषय, कलात्मक दृष्टिकोनातून केलेली मांडणी आणि सूचक पद्धतीने मांडलेला विचार यामुळे विद्यार्थ्यांचे सादरीकरण अतिशय प्रभावी झाले. लोकगीते, लोकसंगीत आणि स्थानिक वाद्ये यातून राष्ट्रीय पातळीवर असणारे कलेतील वैविध्य पहावयास मिळाले. युवा महोत्सवाच्या तिसऱ्या दिवशी दुपारपर्यंत सुगम संगीत, वादविवाद स्पर्धा, मांडणी शिल्प, एकांकीका, व्यंगचित्र रेखाटन आदी स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी कला सादर केल्या. सुगम संगीतामध्ये भारती विद्यापीठच्या विद्यार्थ्यांनी 'अवघे गरजे पंढरपूर' हा अभंग गायला. तर विविध विषयावरील एकांकिका स्पर्धा पाहून प्रेक्षक अंतर्मुख झाले. मांडणी शिल्प स्पर्धेतही विद्यार्थ्यांनी टाकाऊ वस्तूपासून स्वप्नातील भारत विषयावर अप्रतिम टिकाऊ वस्तू तयार केल्या होत्या. एकंदरीत युवा महोत्सवामध्ये सहभागी झालेल्या युवकांमुळे वातावरण उत्साहपूर्ण आहे. सहभागी झालेल्या प्रशिक्षक, विद्यार्थ्यांशी आमच्या प्रतिनिधीने संवाद साधला यावेळी महोत्सवाबद्दल त्यांनी आपली मते मांडली.



वादविवाद स्पर्धेत आपला विषय सादर करताना महात्मा गांधी युनिव्हर्सिटी केरळाची विद्यार्थिनी.

## जैवविविधतेने नटलेले विद्यापीठ

देशभरातून राष्ट्रीय युवा महोत्सवासाठी आलेल्या विद्यार्थ्यांसाठी शिवाजी विद्यापीठाने अतिशय चांगल्या सोयी-सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. युवा महोत्सवाच्या व्यासपीठावरुन विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्त्व विकास होतो. तसेच त्यांच्या कलागुणांना न्यायही मिळतो. शिवाजी विद्यापीठाकडे पाहून जैवविविधतेने नटलेले विद्यापीठ वाटले.

– ललितमोहन सोनी (प्रशिक्षक बनारस हिंदू विश्वविद्यालय)

## अभ्यासपूर्ण नियोजनाचा अभाव

राष्ट्रीय युवा महोत्सवाचे नियोजन करीत असताना पूर्वतयारी केली पाहिजे. शिवाजी विद्यापीठामध्ये काही प्राथमिक सोयी-सुविधांची कमी भासली. काही गोष्टीत तक्रारीनंतरच अडचणी दूर झाल्याचा अनुभव आला. मात्र युवा महोत्सवातून विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढण्यास मदत होईल.

- प्रा. शारंगधर साठे (प्रशिक्षक भारती विद्यापीठ पुणे)

## राजकारण विरहित निकाल असावा

युवा महोत्सवाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या अंतर्गत गुणांची पारख होते. ही स्पर्धा आहे, यामध्ये हार आणि जीत ही राहणारच. या स्पर्धेत हारणारे विद्यार्थी रिकाम्या हाताने जात नाहीत. तर आपली कला सादर करण्यासाठी आपण कोठे कमी पडलो, याची त्यांना जाणीव होते. युवा महोत्सवाच्या निकालात राजकारण येऊ नये, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

- दिप्ती रेगे, (प्रशिक्षक एसएनडीटी विद्यापीठ मुंबई)

## शाहूंचा इतिहास जाणून घेतला

शिवाजी विद्यापीठाने युवा महोत्सवाचे केलेले नियोजन अतिशय उत्कृष्ट आहे. बोटॅनिकल गार्डनमधील विविध वनस्पती पाहून पर्यावरणातील जैवविविधता समजली. तसेच कोल्हापुरी चप्पल, तांबडा-पांढरा या खाद्यपदार्थांचा अस्वाद घेतला. तसेच अंबाबाई दर्शन आणि न्यू पॅलेस पाहून राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचा इतिहास समजला.

- अमृत कौर, विद्यार्थिनी पंजाब युनिव्हर्सिटी पंजाब

## कोल्हापूरच्या लोकांमध्ये मदत करण्याची भावना

युवा महोत्सवामध्ये एखाद्या स्पर्धेसाठी जाण्याचा मार्ग असो किंवा इतर कोणतीही माहिती असो कोल्हापुरातील लोक लगेच देतात. हा येथील लोकांचा गुण आहे. त्यांच्यात कोणत्याही गोष्टीत मदत करण्याची भावना असल्याचे वेगळेपण पाहिले. तसेच कोल्हापूरसह इतर देशातील संस्कृती युवा महोत्सवात आलेल्या अनेक विद्यापीठांच्या विद्यार्थ्यांमुळे पाहवयास मिळाली.

- रोशन रामरसयानी (विद्यार्थीनी संत गाडगे महाराज विद्यापीठ, अमरावती)

# युवा महोत्सवातून राष्ट्रीय मूल्यांचे संवर्धन

## डॉ. डेव्हीड सॅम्पसन यांचे मत : 'तरुण भारत'शी साधला संवाद

अहिल्या परकाळे

कोल्हापूर

भारतात चार प्रकारचे युवा महोत्सव होतात. या माध्यमातून राष्ट्रीय एकात्मतेचे दर्शन होते. कारण महोत्सवातील सहभागी कलाकार विविध राज्यातील, जातीधर्मातील असतात. त्यामुळे देशभरातील संस्कृती, कला व भाषेची देवाणघेवाण होते. युवा महोत्सवाच्या माध्यमातूनच विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होतो. त्यांच्यातील कलेला वाव मिळतो. कारण तारुण्य हे सूर्यप्रकाशासारखे लख्ख असते. तारुण्यातच सृजनशीलतेची क्षमता व प्रमाण सर्वाधिक असते. या ऊर्जेचा सकारात्मक वापर केला पाहिजे. मानवी व राष्ट्रीय मूल्यांचे संवर्धन करण्यासाठी पूरक असा व्यक्तिमत्त्व विकास युवकांनी अशा महोत्सवांतून साधला पाहिजे, असा सल्ला भारतीय विद्यापीठ महासंघाचे सहसचिव डॉ. डेव्हीड सॅम्पसन यांनी दिला. महोत्सवाच्यानिमित्त 'तरुण भारत'शी त्यांनी संवाद साधला.

भारतीय विद्यापीठ महासंघाची (एआययू) भूमिका व युथ फेस्टिव्हलबद्दल डॉ. डेव्हीड सॅम्पसन म्हणाले, गेल्या चार दशकात देशभरात विविध युवा महोत्सव झाले. या महोत्सवाच्या माध्यमातून राष्ट्रीय एकात्मतेचे दर्शन होते. विविध राज्यातील, जातीधर्मातील विद्यार्थी एकमेकांना जाणून घेतात, एकमेकाच्या कला, संस्कृती वेशभूषा आत्मसात करतात. एकटेपणा विसरून खुल्या वातावरणात मिसळून जातात, हेच युवा महोत्सवाचे उद्दीष्ट आहे. युवा महोत्सवात तणावमुक्त वातावरण असते. हे व्यासपीठ युवा कलाकारांसाठी मोठी पर्वणी आहे. यातून कलाकारांच्या कल्पकतेला दिशा मिळते. चित्रपट अभिनेते सचिन खेडेकर, टेलिव्हिजनवरील प्रोग्रॅम व मालिकांमध्ये काम करणारे कपिल शर्मा, सुगांधा मिश्रा, विवेक ओबेराय आदी कलाकार युवा महोत्सवाच्या माध्यमातूनच पुढे आले आहेत. म्हणून युवा महोत्सवातील कलाकारांनी करिअर म्हणून युवा महोत्सवाकडे पाहिले तर वावगे ठरणार नाही.

युवा महोत्सवाच्या उद्देशाबद्दल सॅम्पसन म्हणाले, युवा महोत्सवाने मने जोडली जातात. 'विविधता मे एकता यही हमारी विशेषता' ही भावना विद्यार्थ्यांच्या मनामध्ये बिंबवली जाते. देशाच्या सांस्कृतिक वैभवाची प्रचिती युवापिढीला महोत्सवाच्या माध्यमातून येते. हाच या महोत्सवाचा उद्देश आहे.



देशातील युवा पिढीबद्दल ते म्हणाले, संपूर्ण जगातच आतंकवाद वाढत आहे. आतंकवादी युवकांना अंमली पदार्थ सेवनाची सवय लावून, पैशाचे आमिष दाखवून त्यांना दहशतवादी बनवण्याचा प्रयत्न केला जात आहे. जास्तीत जास्त युवकांमध्ये नृत्य, गाणे, संगीत रुजवण्याचा प्रयत्न शाळा महाविद्यालयांनी केला पाहिजे. कारण कला संस्कृतीच आतंकवादातून युवकांना परावृत्त करू शकते.

देशाचा विकास आणि युवकांचे योगदान याबद्दल सॅम्पसन म्हणाले, युवा मने ही उत्साही आणि कल्पक असतात. त्यांच्यातील जिद्द, आत्मविश्वास याचा उपयोग देशाच्या विकासासाठी झाला पाहिजे. सध्या देशात मेक इन इंडिया आणि मेड इन इंडिया ही चळवळ जोमाने सुरू आहे. या अंतर्गत युवकांनी आपल्या कल्पकतेतून उत्पादने बनवली पाहिजेत. त्यातून मोठ्या प्रमाणात रोजगार निर्माण होतील. अर्थव्यवस्था भक्कम होईल. सॅम्पसन यांनी युवकांना स्वतःचे व्यक्तिमत्व ओळखण्याचा सल्ला दिला. ते म्हणाले, युवकांनी आपल्या कौशल्याचा, उर्जेचा चांगला वापर केला तर अब्दुल कलामांच्या स्वप्नातील भारत निर्माण होण्यास वेळ लागणार नाही. मी गेल्या ४ दशकांपासून युवकांशी जोडला गेलो आहे. त्यांच्यातील सकारात्मक उर्जेची मला जाणीव आहे. त्यांनी जर स्वतःमधील गुणांचा वापर समाजासाठी केली. तर आपल्याकडे नवे आदर्श तयार होतील.

13 FEB 2017
जनसंपर्क कक्ष
तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : समूह गायनाची रंगीत तालीम करताना गणपत युनिव्हर्सिटी मेहसाना गुजरातचे विद्यार्थी. (छाया : इम्रान गवंडी)

13 FEB 2017

**Times of India**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# Inter university fest at SUK in a full swing

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** Shivostav-2017 , an inter-university festival started with much fanfare at Shivaji University, Kolhapur (SUK) on Friday.

The main events of the festival have been organised at the main auditorium.

The weekends witnessed heavy rush of visitors from nearby colleges. The audience also comprised participants' parents and people from across the city.

The weekend began with competitions in installation, cartooning and debate.

According to an SUK official, "Participants in the installation competition created interesting home decor using scrap material. One of the installations was themed, 'My Dream'."

Students from Raipur, Rajasthan, Solapur, Karnataka and Tamil Nadu took part in the event.

On Saturday afternoon, a cartooning competition on cashless India was conducted. In the evening session, mime and classical vocal competitions were held.

The five-day festival will end on Tuesday. Results for all contests will be announced on Tuesday.

The event was formally inaugurated by Marathi film actor Sachin Khedekar, Chhatrapati Shahu Maharaj and various other dignitaries from SUK.

According to SUK officials, 26 events have been organised and over 80 teams registered for the event.



TOI

Participants created interesting home decor from scrap materials during Shivostav festival on Saturday

CAMPUS BUZZ

**Lecture at SUK:** The deputy superintendant of police Satish Mane will deliver a lecture at the SUK pre-guidance centre on Thursday.

An SUK circular released recently said that he will offer guidance to students appearing for competitive exams.

An official said that the centre, which gets financial aid from the University Grants Commission (UGC), offers coaching for civil services exams like the UPSC and MPSC, along with banking and other such examinations.

The official added that the centre facilitates expert lectures, personality development and skill enhancement programmes, along with boosting communication skills for students.

**Awareness workshop on Visakha guidelines:** The Maharashtra state commission for women had conducted a one-day workshop on the awareness on the Visakha guidelines, which is a set of guidelines in case of sexual harassment cases, on February 7 at the Shivaji University, Kolhapur (SUK) campus.

Manjusha Molawane the deputy secretary of the Maharashtra state commission for women was invited for the workshop.

According to an SUK official every college, should have a working, functional, and active internal complaints committee on sexual harassment.

13 FEB 2017

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ना शस्त्र, ना शत्रू ...युद्ध कशा

## राष्ट्रीय युवा महोत्सवात मुकनाट्यातून मांडला युद्धांचा इतिहास ; १५ विद्यापीठांनी आदीमानवापासून ते अमेरि



कोल्हापूर : युवा महोत्सवात मूकनाट्य स्पर्धेत 'युध्द कशामुळे झाले' या विषयाचे सादरीकरण करताना शिवाजी विद्यापीठातील शेखर नव
दुसऱ्या छायाचित्रात समुहगीत गायन स्पर्धेत समुहगीत सादर करताना कालिकत युनिव्हर्सिटी केरलाचे विद्यार्थी.

प्रतिनिधी
कोल्हापूर

युद्धाने मानवी जीवन उद्‌ध्वस्त झाले. पिढ्यांनपिढ्या बरबाद झाल्या. पण युद्ध झाले कशामुळे? हे मात्र समजलेच नाही. त्यामुळे युद्ध झाले कशामुळे ही संकल्पना घेऊन १५ विद्यापीठांनी रविवारी मुकनाट्य सादर केले. भाषा भवनातील वि. स. खांडेकर सभागृहात हे नाट्य सादर करण्यात आले. शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी 'आदीमानवापासून एकविसाव्या शतकापर्यंत युद्धाच्या पद्धती कशा बदलल्या' याचे सादरीकरण केले.

एका बाजूला युद्धाने अनेक देश बेचिराख केले. तर दुसऱ्या महायुद्धामुळे विज्ञान, तंत्रज्ञानाचा विकास झाला. असेही म्हटले जाते. जगातील युद्धांचे नेमके कारण काय? कोणाच्या स्वार्थामुळे युद्ध झाले? या न सुटलेल्या कोड्याची उकल विद्यार्थ्यांनी आपल्या नाट्यप्रयोगातून केली. एकच विषय विविध पद्धतीने मांडल्यामुळे युवकांमधील कलात्मकता दिसून आली. पाच मिनिटांच्या कालावधीत सूचक पद्धतीने मांडलेला विचार यामुळे विद्यार्थ्यांचे सादरीकरण अतिशय प्रभावी झाले. शिवाजी विद्यापीठातील शेखर नवतरे, गजानन मानवर, आकाश लिगाडे, गणेश इंडीकर, अक्षय कडोले, बबन शिंदे यांनी मूकनाट्याचे सादरीकरण केले होते. त्यांना शैलेश शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले.

कुरुक्षेत्र युनिव्हर्सिटी हरियाणा यांनी ग्रामीण भागातील बैलगाडी, मोटारसायकल, नैसर्गिक आपत्ती आदी कारणाने युद्ध कसे झाले याचे उत्कृष्ट सादरीकरण केले. देवी अहिल्याबाई युनिव्हर्सिटी मध्यप्रदेश, लवली युनिव्हर्सिटी पंजाब यांच्यासह १५ विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी आदीमानवापासून ते अमेरिकतील रोबोयुद्धापर्यंतची मांडणी केली. विषयांचे वैविध्य हे या स्पर्धेचे वैशिष्ट्य ठरले. पाण्याचे महत्त्व व व्यवस्थापन, सीताहरण, ग्रेट अशोका, भारतीय सैन्यदल व सुरक्षा, सर्जिकल स्ट्राइक असे एकापेक्षा एक अनोखे विषय घेऊन विद्यार्थ्यांनी सादरीकरण केले.

वनस्पतीशास्त्र अधिविभागाच्यां नीलांबरी सभागृहात वादविवाद स्पर्धेलाही प्रतिसाद लाभला. 'कॅशलेश व्यवहार हा भारतीय अर्थव्यवस्था भरभराटीस आणण्याचा एकमेव पर्याय आहे, असा विषय विद्यार्थ्यांना देण्यात आला होता. विद्यार्थी-विद्यार्थिनींनी या विषयावर अत्यंत अभ्यासपूर्ण मांडणी केली. कॅशलेश व्यवहारांच्या एक प्रकारे प्रचार आणि प्रसारच विद्यार्थ्यांनी केला. या स्पर्धेनंतर नीलांबरी सभागृहातच प्रश्नमंजुषा स्पर्धेची अंतिम फेरीही पार पडली.

मानव्यविद्या सभागृहात झालेल्या व्यंगचित्रकला स्पर्धेसाठीही 'कॅशलेस इंडिया' हा विषय देण्यात आला होता. कुंचल्याच्या फटकाऱ्यातून या विषयावर भाष्य करण्याचे आव्हानही विद्यार्थ्यांनी लीलया पेलल्याचे दिसले. एकच विषय पण, तो मांडण्याची प्रत्येकाची चित्रशैली वेगळी होती. व्यंगचित्राचा हेतूच मुळी चिमटे काढण्याचा असल्याने या विषयाच्या दोन्ही बाजूंवर तिरकस भाष्य करणारी चित्रे कॅनव्हासवर साकारताना पाहणे रंजक ठरले.

### स्पर्धेत संगीत, नाटक, पोषाख, वाद्यांमध्ये पारंपारिकतेचा प्रभाव

राष्ट्रीय युवा महोत्सवात लोक संगीत, शिल्प, चित्र, एकांकिका, मूकनाट्य अशा अनेक लोककला सादर करण्याऱ्या स्पर्धा सुरु आहेत. यामध्ये बेंगलोर, पश्चिम बंगाल, आंध्र, आसाम, छत्तीसगढ, हरियाणा, केरळ अशा अनेक राज्ये सहभागी आहेत. भारतीय संस्कृतीमध्ये असणारे वैविध्य या प्रत्येक स्पर्धेत प्रकर्षाने जाणवत आहे. एकांकिका सादर करताना या मुलांनी सादर केलेले विषय हे मुख्यता त्यांच्या प्रादेशिक समस्यांवर आधारित होते. काहींनी सामाजिक वास्तव मांडले, तर काहींनी आपल्या परंपरा जपणाऱ्या पौराणिक कथांची आधुनिक युगाशी सांगड घालून परिस्थिती अजून ही 'जैसे थे' असल्याची जाणीव करून दिली. ही नाटके सादर करताना या मुलांनी आपल्या परंपरा जपल्या आहेत. सादर केलेल्या प्रत्येक नाटकात करण्यात आलेले नेपथ्य हे त्या राज्याची ओळख दर्शवविणारे होते. तर त्यांनी सादर केलेले समुह गायनात देखील पारंपरिक पोषाखांना प्राधान्य दिले गेले. पंजाबी धोती, कुर्ता, अन पगडी, आसामचा मुगा सिल्क, केरळची सफेद लुंगी, साडी, हरायणवी सलवार-कुर्ता असे नानाविध प्रकारचे पोषाख परिधान केलेल्या स्पर्धकांमुळे भारतात असलेल्या पारंपारिक पोषाखांचे दर्शन घडले. याचबरोबर केरळचे 'तोतम्', आसामचे 'बोरटाल', बांबूपासून बनविलेले वाद्य, पंजाबचे 'बुगची', पश्चिम बंगालचे मादोल, खमक, धम्सा, एकतारा, दोनतारा, असे वाद्यांतदेखील वैविध्य दिसले.

### मूकनाट्यातून पक्ष्यांच्या हावाभावाचे हुबेहुब सादरीकरण

सायंकाळी भाषाभवन येथील मूकनाट्याच्या

### केरळचा 'नाडणपाड्ड'

केरळमध्ये 'नाडणपाड्ड' लोकसंगीताचा प्रकार विशेष प्रसिद्ध आहे. लोकसंगीताच्या समुह गायनावेळी कालिकत विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी नाडणपाड्ड हे संगीत, तसेच शास्त्रीय गायन सादर केले. केरळमधील शेतकरी वर्गात हा संगीताचा प्रकार अधिक लोकप्रिय आहे. पेरणी, भात लावणीवेळी शेतकरी या संगीताचा आधार घेऊन आपली कामे सुरू ठेवतात. स्त्री-पुरूष दोघेही ही गीते गाताना दिसतात. याचबरोबर पूजाअर्चा करताना मंदिरांमध्ये पुल्लवण-पाट्ट हे संगीत गायले जाते.





सेल्फी काढताना म्हैसूर युनिव्हर्सिटी कर्नाटक विद्यापीठाच्या विद्यार्थीनी. दुसऱ्या छायाचित्रात सेंट्रल युनिव्हर्सिटीच्या विद्यार्थ्यांनी टाकाऊ वस्तूपासुन तयार केलेली प्रतिकृती. तिसऱ्या छ

# मुळे झाले ?

## कतील रोबोयुद्धापर्यंतची केली मांडणी



शिल्पकला स्पर्धेत शिल्प साकारताना विद्यार्थी.



रे, गजानन मानवर, आकाश लिगाडे, गणेश इंडीकर, अक्षय कडोले, बबन शिंदे.

स्पर्धेत इंदूरच्या देवी अहिल्या विद्यापीठाने पक्ष्यांचे हावभाव मूकनाट्यातून सादर केले. त्यांचे आकाशात संथ विहारणे, शिकाऱ्याने गोळीबार केल्यानंतर जखमी पक्ष्याची तडफड, मोठ्या पक्ष्याने झडप घालून उचलून नेल्यानंतर त्याच्या तावडीतून सुटण्याची धडपड अशा अनेक प्रसंगांनी रसिकांची उत्स्फूर्त दाद मिळवली.

### आसामचा 'बिहु' लक्षवेधी

आसाममध्ये असणाऱ्या साधारण १२६ जमातींमध्ये 'बिहु' ही लोककला लोकप्रिय आहे. हा कलाप्रकार विशेषत: वसंत ऋतूचे आगमन साजरे करताना सादर केला जातो. वसंताच्या पहिल्या आठवड्यात रोज वेगवेगळे बिहु नृत्ये, संगीत महोत्सवाचे आयोजन होते. यावेळी अबालवृद्ध एकत्र येऊन नृत्य, गीत, विविध खेळ करून आनंदोत्सव साजरा करतात. या नृत्यावेळी प्लेट्स तोंडात धरून गोल फिरणे, उडी मारून गिरकी घेणे असे धाडसी नृत्य प्रकार रंगतात. तसेच बारटोल, ढोलक या वाद्यामुळे हा आनंदोत्सव आणखी आकर्षक होतो. आसाममध्ये वापरले जाणारे 'मुगा सिल्क' हा पोषाख यावेळी स्त्री–पुरूष परिधान करतात. यावर आवडीनुसार लाल रंगाने नक्षीकाम केलेले असते.

### 'और एक शकुंतला..

१२वे शतक असूदे अथवा २१ शतक.. स्त्री तेव्हा ही वासनेची शिकार होत होती, अन् आजही आहे. हे कटू वास्तव मांडणारी एकांकिका रविवारी सकाळी भाषाभवन येथे आसामच्या विद्यार्थ्यांनी सादर केली. आसामी भाषेतून असलेले हे नाटक रसिकांच्या काळजाला भिडले. यावेळी भाषेचा कोणताही अडसर निर्माण झाला नाही. नाटकातील उत्तम जागांवेळी अभिनय कौशल्य दिसल्यानंतर प्रेक्षकांनी टाळ्यांच्या कडकडाटात प्रतिसाद दिला. इतिहासातील शकुंतला एका राजाच्या वासनेला बळी पडली. तर आधुनिक काळातील एक मुकबधीर महिला समाजात वावरणाऱ्या अतृप्त वासनेची बळी ठरली. दोन्ही काळातील स्त्रीची अवहेलना, तिची होणारी कुचंबणा यातून दिसली. शंकुंतलाची भूमिका वठवणाऱ्या अभिनेत्रीच्या अभिनयामुळे नाटक रसिकांना शेवटपर्यंत खिळवून ठेवते.

### पाहुण्यांना विद्यापीठीय विद्यार्थ्यांचा 'मदतीचा हात'

राष्ट्रीय युवा महोत्सवानिमित्त देशभरातील ८० विद्यापीठातील स्पर्धक शिवाजी विद्यापीठात दाखल झाले आहेत. विद्यापीठ परिसर हा विस्तृत जागेत पसरला आहे. यावेळी कोणते सभागृह कोठे आहे, भोजनव्यवस्था कोठे आहे, पीआरओ ऑफिस, वसतिगृह कोठे आहे, अशी बरीच माहिती त्यांना सतत पुरवावी लागते. नवीन परिसरात हे पाहुणे स्पर्धक गोंधळून जातात. अशा वेळी विद्यापीठातील विद्यार्थी या पाहुण्यांना मदत करण्यासाठी नेहमी तत्पर असल्याचे दिसले.

### आज हे कार्यक्रम सादर होणार

- सकाळी ९.३० वाजता– स्कीट (वि.स. खांडेकर भाषा भवन), स्पॉट फोटोग्राफी व स्पॉट पेंटिंग (मानव्यविद्या इमारत), रांगोळी (संगीत अधिविभाग),
- सकाळी १० वाजता– शास्त्रीय नृत्य (लोककला केंद्र)
- दुपारी ३ वाजता– लोकनृत्य/ आदिवासी नृत्य (लोककला केंद्र)
- सायं. ५ वाजता– मिमिक्री (वि. स. खांडेकर भाषा भवन)



याचित्रात मुकनाट्य स्पर्धेत सादरीकरण करताना लवली युनिव्हर्सिटी पंजाबचे विद्यार्थी.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 FEB 2017
Times of India

# Seminar on globalisation at SUK

**Kolhapur:** The Shramik pratisthan, Political science and Marathi department of Shivaji University will be jointly organising a seminar on changing pattern of globalisation on February 16 at V S Khandekar auditorium. The rise of consumerism, crony capitalism has adversely affected us and is one of the main challenges in the 21st century. It is true that we reflect the side effect of globalisation in many ways. Therefore, every up and down has visible impact on the life of common man. The seminar began with an introductory lecture by Marxist political analyst, Bhalchandra Congo. The organiser Megha Pansare said that students are an important elements of our society. Such seminar helps them to understand the changing pattern of globalisation. TNN

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

13 FEB 2017
Times of India

# Shivaji university warns colleges of de-affiliation

Piyush.Bhusari
@timesgroup.com



TOI

All affiliated colleges were given separate email ids last year, but the university says many have not been using them to respond to official e-mails

**Kolhapur:** The Shivaji University has warned its affiliated colleges of strict action, including de-affiliation, if they failed to effectively communicate with the university on the official email id.

In a circular on February 10, the university said all the affiliated colleges have been given separate email ids last year for effective communication but many have not been using it for responding to official e-mails.

The circular added, "Despite reminders, the colleges seem to be ignoring our instructions. We are planning to de-affiliate such colleges. The exam-related work of such colleges too shall be paused."

On September 26 last year, D R More, director, board of colleges and university development (BCUD), issued a circular stating that colleges which will not abide by the instruction will be penalised.

The circular said that if the affiliated colleges are not complying with the instructions, it will be counted as a serious offence. It was also mentioned that the affiliation, eligibility, and the exam functioning of such colleges will be stopped.

In January last year, the SUK had decided go paperless. In a circular on December 30, 2015 e-mail communication through official email id was made mandatory by the university.

## GOING PAPERLESS

Vice-chancellor Devanand Shinde said, "We want our communication to go paperless and email is the best platform for it. Our IT cell has created separate email ids, which have been sent to the colleges. I am hopeful that it will be used by them."

He added, "It is an eco-friendly initiative which will reduce consumption of paper drastically. Also, we often had to face conventional issues like not receiving the courier. Therefore, we decided to start formal email conversations."

An SUK official said, "There are more than 280 colleges in Satara, Sangli and Kolhapur districts affliated with the university. Mostly the colleges outside Kolhapur are the ones which have not opted for formal email conversations."



# 'शिवोत्सवा'त कलागुणांची उधळण...

गेल्या दोन दिवसांपासून शिवाजी विद्यापीठात सुरू असलेल्या तरुणाईच्या कलाविष्काराचे शिखर ठरलेल्या शिवोत्सव महोत्सवात रविवारचा दिवस कलागुणांच्या मुक्त उधळणीत न्हाऊन निघाला. देशभरातून आलेल्या विविध विद्यापीठांच्या कलाकारांनी स्वप्नांची पेरणी केली. रविवारी पंजाबच्या लव्हली प्रोफेशनल युनिव्हर्सिटीच्या मूकनाट्यातील एक क्षण. (विशेष पान-९)

**स्वभाव भावला :** देशभरातील तरुणाईची भावना;

# कोल्हापूरला नाही विसरणार...


महेश प्रजापत (माखनलाल युनिव्हर्सिटी)


स्नेह उपाध्या (ऑलिन युनिव्हर्सिटी)


मिनीला साहू (इंदिरा युनिव्हर्सिटी)


सतवेंद्रपालसिंह (गुरुनानक युनिव्हर्सिटी)


प्राची शर्मा (दयानंद युनिव्हर्सिटी)

**कोल्हापूर :** पहिल्यांदाच राष्ट्रीय युवा महोत्सवात सहभागी झालो अन् विविधांगी कलात्मक ज्ञान अनुभवयास मिळाले. नवे मित्र मिळाले. महोत्सवातून आनंदोत्सव साजरा करताना अनेक आठवणींनी मनात ऋणानुबंधाचे घर तयार केले आहे. इथल्या आठवणी जीवनात कायमच राहतील. कोल्हापूरचे वातावरण प्रेमळ असून त्याची सतत जाणीव होत राहील, अशा दिलखुलास भावना रविवारी 'शिवोत्सव'मधील विद्यार्थी-विद्यार्थिनींनी व्यक्त केल्या.

यात भोपाळच्या माखनलाल चतुर्वेदी विद्यापीठाचा महेश प्रजापत म्हणाला, रायपूरपेक्षा अतिउत्तम कोल्हापूर आहे. एकमेकांना सहकार्य करण्याची प्रचंड इच्छाशक्ती इथल्या लोकांत आहे. पत्रकारितेचा विद्यार्थी असलो तरी कलेचा छंद असल्याने सहभागी होता आले. हा महोत्सव भविष्यात माझ्या करिअरसाठी उपयोगी ठरेल. बिहारमधील ऑलिन मिथिला विद्यापीठाची स्नेह उपाध्या हिने महोत्सवातून मोठा आनंद मिळत असल्याचे सांगितले. ती म्हणाली, शिवाजी विद्यापीठातील विद्यार्थी-विद्यार्थिनींचा स्वभाव भावला. विद्यापीठातील निसर्गरम्य वातावरणाने माझी छायाचित्र टिपण्याची गोडी वाढविली असल्याचे छत्तीसगडमधील खैरागडच्या इंदिरा संगीत कला विद्यापीठाच्या मिनीला साहू हिने सांगितले. अमृतसरच्या गुरुनानक विद्यापीठाचा सतवेंद्रपालसिंह म्हणाला, महोत्सवात विविध राज्यातील विद्यार्थ्यांच्या माध्यमातून मला 'छोटा भारत'चे दर्शन घडले. हरियाणातील महर्षी दयानंद विद्यापीठाची प्राची शर्मा हिने महोत्सवातील सहभागाने आत्मविश्वास वाढला असून, कोल्हापूरचे वातावरण, जेवण खूपच छान वाटल्याचे सांगितले.







शिवाजी विद्यापीठात सुरू असलेल्या 'शिवोत्सव' या ३२ व्या राष्ट्रीय आंतरविद्यापीठीय युवा महोत्सवाचे रविवारी कुरुक्षेत्र विद्यापीठाने सादर केलेल्या मूकनाट्यातील एक क्षण. दुसऱ्या छायाचित्रात यजमान शिवाजी विद्यापीठाच्या संघाने मूकनाट्य सादर केले. यात या संघाने मानवाची ओळख युद्धात नव्हे, तर शांतीत असल्याचा संदेश देत उपस्थितांची मने जिंकली. तिसऱ्या छायाचित्रात शनिवारी सादर झालेल्या कलाविष्काराचे 'लोकमत'मधील वार्तांकन आसाममधील गुवाहाटी विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी रविवारी उत्सुकतेने जाणून घेतले.

# कलाविष्काराचा उलगडला नजराणा

## तरुणाईचा उत्साह : नवकल्पनेचे दर्शन, सामाजिक प्रश्नांचे भान

**कोल्हापूर** : सामाजिक प्रश्नांवर भाष्य करणारे मूकनाट्य, सुरमयी सफर घडविणारे शास्त्रीय गायन, देशप्रेम जागविणारे समूहगीत अशा विविधांगी कलासंगमाचा नजराणा 'शिवोत्सव' या ३२ व्या राष्ट्रीय आंतरविद्यापीठीय युवा महोत्सवात रविवारी उलगडला. महोत्सवाच्या तिसऱ्या दिवशीही तरुणाईच्या उत्साहाला उधाण आल्याचे दिसून आले.

महोत्सवात रविवारी सकाळच्या सत्रात वादविवाद, प्रश्नमंजुषेची अंतिम फेरी, मांडणी, व्यंगचित्रे, आदी कार्यक्रम झाले. यातून तरुणाईने नवकल्पनेचे दर्शन घडविले. लोककला केंद्रात दुपारी दोनच्या सुमारास समूहगीतांना सुरुवात झाली. यातून स्पर्धकांनी देशभक्ती जागविली. शिवाय आपल्या मातृभाषेतील भावगीताने उपस्थितांचे कान तृप्त केले.

यामध्ये कर्नाटकातील म्हैसूर विद्यापीठाने 'वंदेमातरम्' गीताचे सादरीकरण सुरू करताच खचाखच भरलेल्या सभागृहातील प्रेक्षकांनी उभे राहून देशाप्रतीच्या अभिमानाचे दर्शन घडविले. रात्री आठ वाजेपर्यंत समूहगीत रंगले. प्रत्येक संघाच्या सादरीकरणाला प्रेक्षक टाळ्यांच्या कडकडाटात प्रतिसाद देत होते. सकाळच्या सत्रातील एकांकिका आणि समूहगीत गायनाच्या स्पर्धा काहीशा रेंगाळल्या.

वि. स. खांडेकर भाषाभवनात विविध विषयांवरील एकांकिका तब्बल सात तास चालल्या. मानव्यशास्त्र इमारतीमधील मातीकामातून स्पर्धकांनी ओझे वाहणारा कामगार, मानवी आयुष्यातील 'संघर्ष' दाखवून दिला. दिवसभरातील शास्त्रीय गायन वगळता बहुतांश कलाप्रकारांच्या स्पर्धा सायंकाळी साडेपाचपर्यंत संपल्या. त्यामुळे अनेकांची पावले मूकनाट्यासाठी वि. स. खांडेकर भाषाभवनाकडे वळली.

सायंकाळी सातच्या सुमारास या ठिकाणी मूकनाट्यांची सुरुवात झाली. यात बोलीभाषा आणि शब्दांशिवाय निव्वळ देहबोलीतून विविध १५ संघांनी सामाजिक, शैक्षणिक प्रश्नांचा वेध घेत उपस्थितांना विचार करायला भाग पाडले.

यजमान शिवाजी विद्यापीठाच्या संघाने भारतीय युद्धनीतीसह मनुष्याच्या काही गरजा, स्वाभिमानासाठी पूर्वीच्या काळापासून आपापसांमध्ये सुरू असलेला संघर्ष मांडला. अन्य संघांनी पाणी वाचवा, स्त्रीभ्रूण हत्या, पर्यावरण रक्षण, आदींबाबत मूकनाट्यातून संदेश दिला. (प्रतिनिधी)

## यजमान विद्यापीठ दोन कलाप्रकारांत

या महोत्सवामध्ये यजमान शिवाजी विद्यापीठ हे मूकनाट्य आणि स्थळचित्रण प्रकारात सहभागी आहे. यातील मूकनाट्यात विद्यापीठाच्या संघाने 'मानवाची खरी ओळख ही युद्धात नाही, तर शांतीत आहे,' असा प्रभावी संदेश देत प्रेक्षकांची मने जिंकली. दरम्यान, रविवारी मानव्यशास्त्र इमारतीमध्ये झालेल्या व्यंगचित्र कलाप्रकारात विविध स्पर्धकांनी 'कॅशलेस इंडिया'चे वास्तव मांडले.

## कर्मचारी, स्पर्धकांचा प्रामाणिकपणा

लोककला केंद्र परिसरातील नोंदणी कक्षात चौकशी करण्यासाठी पंजाब विद्यापीठातील अमनप्रीत ही विद्यार्थिनी आली होती. माहिती घेतल्यानंतर ती येथून निघून गेली. मात्र, तिचा मोबाईल याठिकाणी विसरला. या कक्षातील विद्यापीठाचे कर्मचारी सचिन यादव यांनी संबंधित विद्यार्थिनीला शोधून काही मिनिटांतच तिचा मोबाईल तिला दिला. लोककला वाद्यवृंदाच्या सादरीकरणानंतर वसतिगृहाकडे जाणाऱ्या पंजाब कृषी विद्यापीठाच्या सतवीरसिंग यांना रस्त्यावर छोटी बॅग सापडली. त्यांनी तातडीने ही बॅग वसतिगृहातील विद्यापीठाच्या कर्मचाऱ्यांकडे सोपविली.

## महोत्सवात आज

- सकाळी ९.३० वा. : लघुनाटिका (वि. स. खांडेकर भाषाभवन)
  : स्थळ छायाचित्रण, रंगकाम (मानव्यशास्त्र इमारत)
  : रांगोळी (संगीत व नाट्यशास्त्र विभाग)
- सकाळी १० वा. : शास्त्रीय नृत्य (लोककला केंद्र)
- दुपारी ४ वा. : लोकनृत्य (लोककला केंद्र)
- सायंकाळी ५. ३० वा. : मिमिक्री

संकलन : **संतोष मिठारी, संतोष तोडकर, आयुब मुल्ला**
सर्व छायाचित्रे : **दीपक जाधव**

# तरुणाई संवेदनशील, लक्ष्यकेंद्रित काम करणारी

## एस. के. शर्मा; महोत्सव समाजाभिमुख हवा



कोल्हापूर : देशभरातील सध्याची तरुणाई संवेदनशील आणि लक्ष्य केंद्रित काम करणारी असल्याचे मत भारतीय विद्यापीठ महासंघाच्या महोत्सव विभागाचे निरीक्षक एस. के. शर्मा यांनी रविवारी व्यक्त केले.

निरीक्षक शर्मा म्हणाले, सोशल मीडियात तरुणाई गुंतली आहे. तिचे सामाजिक, शैक्षणिक आदी क्षेत्रांकडे दुर्लक्ष असल्याचे बोलले जाते. अशा युवावर्गाची टक्केवारी कमी आहे. सध्याची अधिकतर तरुणाई संवेदनशील, लक्ष्यकेंद्रित काम करणारी आहे. विभागीय, राष्ट्रीय पातळीवरील युवा महोत्सवातून त्याचे दर्शन घडते. यातील विविध स्पर्धांसाठी ते वर्षभर तयारी करतात. त्यांचे कलाविष्कार एकाहून एक सरस आहेत. वर्षागणिक तरुणाईच्या कलाविष्काराचा दर्जा वाढत आहे. स्पर्धांचे परीक्षण करताना अनेकदा परीक्षकांची कसरत होते. परीक्षणामध्ये जात, धर्म, पंथ, प्रदेश आदींच्या अनुषंगाने कोणताही भेदभाव केला जात नाही.

कलागुणांच्या सादरीकरणाला व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासह त्यांना विविध राज्यांची संस्कृती समजावी. त्यांनी ती अनुभवावी या उद्देशाने दरवर्षी एका नव्या विभागात महोत्सव घेतला जातो. कला ही चार भिंती आणि विशिष्ट्य एका परिसरात सादर करण्यासाठी नसते, ती समाजापर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. ते लक्षात घेऊन गाव, शहर पातळीवर आणि लोकांमध्ये महोत्सव साजरा करण्याबाबतचा प्रस्ताव 'एआययु'ला सादर केला आहे. याबाबत सकारात्मक कार्यवाही होईल, अशी अपेक्षा आहे.

शिवोत्सव : कलागुणांच्या उधळणीत रंगला तिसरा दिवस

# मांडणशिल्पातून स्वप्नांची पेरणी

कोल्हापूर : गेल्या दोन दिवसांपासून शिवाजी विद्यापीठात सुरू असलेल्या तरुणाईच्या कलाविष्काराचे शिखर ठरलेल्या 'शिवोत्सव' महोत्सवात रविवारचा दिवस कलागुणांच्या मुक्त उधळणीत न्हाऊन निघाला. 'माय ड्रीम' या थीमवर आधारित मांडणशिल्पातून देशभरातून आलेल्या विविध विद्यापीठांच्या कलाकारांनी स्वप्नांची पेरणी केली.

तिसऱ्या दिवसाच्या महोत्सवाची सुरुवात मांडणशिल्प कलाप्रकाराने झाली. भाषाशास्त्र इमारतीसमोरील आवारात झालेल्या स्पर्धेत झाडाच्या फांद्या, गवत, पाने, फुले, विटा, वर्तमानपत्रांची रद्दी, फुटक्या पाईप्स, मोकळे बॉक्स, कागदी प्लेट्स, आदी मिळेल त्या वस्तूंचा वापर करून विद्यार्थ्यांनी कलाकृतींची मांडणी केली. त्यामध्ये पंधरा संघांनी सहभाग घेतला. राजस्थान विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी 'ग्रीन सोसायटी, क्लीन सोसायटी' ही संकल्पना मांडत विकासासोबत पर्यावरणाचाही तितकाच विचार व्हायला हवा आणि फक्त समस्यांवर चर्चा न करता पारंपरिक ऊर्जास्रोतांचा वापर करून प्रदूषण कसे कमी करता येईल, हेदेखील मांडले.

गुलबर्गा विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी उज्ज्वल भारताचे स्वप्न पाहणाऱ्या नागरिकाचे स्वप्न ही संकल्पना मांडत मेक इन इंडिया, कॅशलेस सोसायटी, स्वच्छ भारत अभियान, आदी माध्यमांतून कसा प्रगतिपथावर जात आहे याची मांडणी केली; तर रायपूरच्या इंदिरा गांधी कृषी विद्यापीठाने युवा पिढीच खऱ्या अर्थाने शांतीचं प्रतीक बनू शकते, हे आपल्या कलाकृतीतून मांडण्याचा प्रयत्न केला. रांची विद्यापीठाने आपल्या कलाकृतीतून जागतिक शांततेचा संदेश दिला. पंजाबच्या लव्हली विद्यापीठाने प्लास्टिकच्या वापरामुळे समाजजीवन कसे भोवऱ्यात अडकले आहे, त्याची मांडणी केली.

देशातील विविधता व त्यातून एकतेची भावना संगीताच्या माध्यमातून कशी गुंफण्यात आली आहे, त्याची प्रचिती लोककला केंद्रात सादर झालेल्या सुगम गीतगायनातून आली. यावेळी मुंबई विद्यापीठाच्या कलाकारांनी 'अवघे गर्जे पंढरपूर' हा अभंग सादर केला; तर पंजाबमधून आलेल्या 'मैं जिसे पूज रहा था वो पत्थर निकला', 'अगर तलाश करूँ कोई मिल जाएगा... मगर तुम्हारी तरह कौन मुझे चाहेगा' अशा गजला सादर केल्या. त्यानंतर विविध विद्यापीठांतील विद्यार्थ्यांनी स्थानिक भाषेतील प्रसिद्ध रचना सादर करून उपस्थितांची मने जिंकली.



कोल्हापुरातील शिवाजी विद्यापीठात सुरू असलेल्या ३२ व्या राष्ट्रीय आंतरविद्यापीठीय युवा महोत्सवात रविवारी आसामच्या तेजपूर विद्यापीठाने संस्कृती व परंपरेचा मिलाफ असलेल्या एकांकिकेतून उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले.

## एकांकिकांनी गाजविला दिवस

महोत्सवातील एकांकिका स्पर्धेत एकूण पंधरा संघांनी सहभाग घेतला. वि. स. खांडेकर भाषाभवनातील एकांकिका स्पर्धेत तिसऱ्या दिवसीच्या एकांकिकेची सुरुवात भोपाळच्या माखनलाल चतुर्वेदी पत्रकारिता राष्ट्रीय विद्यापीठाच्या तुफान विनोदी 'क्यों मारा' या हास्यनाटिकेने झाली. त्यानंतर नागपूरच्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठाच्या संघाने 'वेलकम' ही वेगळ्या विषयावरील एकांकिका सादर केली. मनुष्यजीवनापासून मुक्तीनंतरच खऱ्या अर्थाने नव्या जगण्याचे वेलकम होते, असा आशय असलेल्या या कलाकृतीने उपस्थितांना विचार करण्यास भाग पाडले. त्यानंतर गुवाहाटीच्या कॉटन कॉलेजने स्त्रियांच्या वर्तमान स्थितीवर भाष्य करणाऱ्या 'और एक शकुंतला'मधून सामाजिक प्रश्नांची मांडणी केली.

## 'नोटाबंदी'वरील वादविवाद रंगला

'आर्थिक विकासासाठी नोटा निश्चलनीकरण हा एकमेव उपाय' या विषयावर निलांबरी सभागृहात आयोजित वादविवाद बौद्धिक चर्चा, दाखले, संदर्भ दाखले यांनी रंगला. देशाच्या स्वातंत्र्यानंतर सर्वसामान्य नागरिकांच्या भल्यासाठी घेण्यात आलेला सर्वात योग्य निर्णय म्हणून केंद्र सरकारने घेतलेल्या नोटाबंदीच्या निर्णयाचे एक बाजूला स्वागत करून समर्थन करण्यात आले; तर दुसऱ्या बाजूने या निर्णयाला कडाडून विरोध करीत हा निर्णय गरिबांना अधिकाधिक गरिबीच्या खाईत लोटणारा आहे, असा कडाडून प्रतिवादही करण्यात आला.

## सलाम इंडियन आर्मी

महोत्सवात मांडणशिल्प कलाप्रकारात सोलापूर विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी 'माय ड्रीम' या संकल्पनेवर आधारित सैन्यदलातील जवानांच्या खडतर जीवनप्रवासावर आधारित कलाकृती मांडली. युद्धप्रसंगी त्याला ज्या कठीण परिस्थितीशी सामना करावा लागतो, त्या भावना कलाकृतीतून मांडल्या. या कलाकृतीची मांडणी संगमेश्वर बिराजदार, ओंकार साठे, प्रदीप भद्रशेट्टी, विक्रांतसिंह चव्हाण या विद्यार्थ्यांनी केली.





कोल्हापुरातील शिवाजी विद्यापीठात सुरू असलेल्या ३२ व्या राष्ट्रीय आंतरविद्यापीठीय युवा महोत्सवात रविवारी औरंगाबादच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या रोहन गायद्रे यांनी गायन सादर केले.



राष्ट्रीय आंतरविद्यापीठीय युवा महोत्सवात रविवारी बनारस हिंदू विद्यापीठाच्या प्रकाश पांडे यांनी गायनकला सादर केली.



आम्ही एकांकिका सादरीकरणासाठी या महोत्सवात आलो आहोत. विद्यापीठाने फारच छान नियोजन केले आहे. आम्ही वेगळ्या गावी आलो आहोत, असे वाटतच नाही.

- शंतनू टेंभरी, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, नागपूर



महोत्सवासाठी गेल्या दोन दिवसांपासून कोल्हापुरात आम्ही आलो आहोत. इथले वातावरण तर चांगले आहेच; तसेच विविध विद्यापीठांतील विद्यार्थ्यांचा कलाविष्कार पाहून मजा आली.

- संगमेश्वर बिराजदार, सोलापूर विद्यापीठ

# पंजाबच्या तरुणाईला परिवर्तनाची अपेक्षा

## महोत्सवातून संस्कृतीची देवाण-घेवाण

**कोल्हापूर :** पंजाबमधील तरुणाईच्या मतदानाचा टक्का वाढला आहे. त्यामुळे आम्हाला यावेळी परिवर्तनाची अपेक्षा आहे. आम्हाला नोकरी हवी आहे, अशा भावना पंजाबमधील युवकांनी रविवारी 'शिवोत्सव'मध्ये व्यक्त केल्या.

पंजाबच्या टेक्निकल युनिव्हर्सिटीमध्ये बी. टेक. अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्षात शिकणाऱ्या जसवीत सिंगने, यंदाच्या निवडणुकीत तरुणाईने प्राधान्याने मतदान केले आहे. त्यामुळे आम्हा युवकांना यावेळी सत्ता परिवर्तनाची अपेक्षा असल्याचे सांगितले. महाराष्ट्र, कोल्हापुरात पहिल्यांदाच आलो असून येथील वातावरण खूपच चांगले असल्याचे त्याने सांगितले.

एम. टेक.मध्ये शिकणाऱ्या जसवंतसिंगने शिक्षणाच्या अद्ययावत सुविधांसह युवकांना नोकरी हवी असल्याचे सांगितले. पंजाब कृषी विद्यापीठाचे संघ व्यवस्थापक असणाऱ्या सतवीरसिंग यांनी सांगितले की, पंजाबच्या विधानसभा निवडणुकीत तरुणाईने अत्यंत जागरूकपणे मतदान केले आहे.

त्यामुळे यावेळी पहिल्यांदाच युवावर्गाच्या मतदानाची टक्केवारी वाढली, हे चांगले चित्र आहे. आम्ही महाराष्ट्रात पहिल्यांदाच आलो आहोत. कोल्हापुरी चप्पलबाबत ऐकून होतो, त्याबद्दल उत्सुकता होती. येथून जाताना मी ती आवर्जून खरेदी करणार आहे. (प्रतिनिधी)

### कोल्हापूरकर 'हेल्पफुल'

- महोत्सवातील सुगम गायनमधील पंजाब कृषी विद्यापीठाची स्पर्धक म्हणून आलेल्या अमनप्रीत कौर हिने कोल्हापूरकर 'हेल्पफुल' असल्याची प्रतिक्रिया दिली.
- यात तिने विसरलेला मोबाईल परत मिळाल्याचा आणि विद्यापीठातील रस्ता चुकल्यानंतर येथील विद्यार्थिनींनी आपल्याला वसतिगृहापर्यंत नेल्याचा प्रसंग सांगितला.
- महोत्सवातून नवी माहिती, कल्पनांचे दर्शन घडत असल्याचेही तिने सांगितले.

### महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची उपस्थिती

रविवार हा सुटीचा दिवस असल्याने देशभरातून आलेल्या तरुणाईच्या कलाकृती पाहण्यासाठी कोल्हापूरसह इतर भागांतील महाविद्यालयीन विद्यार्थी-विद्यार्थिनींनी गर्दी केली होती. प्रादेशिक संस्कृतीचे दर्शन घडविणाऱ्या पेहरावातील मुलामुलींसमवेत अनेकांनी सेल्फी घेऊन ते सोशल मीडियावर शेअर केले.

## कोल्हापुरी मिसळवर ताव

मिसळ म्हटले की खवय्यांच्या तोंडाला पाणी सुटल्यावाचून राहत नाही. त्यातही मिसळ झणझणीत असेल तर मग तिची लज्जत काही औरच असते. कोल्हापूरच्या याच खासियतीची चव घेण्यासाठी कलाकृतीचे सादरीकरण झाल्यानंतर देशभरातील विद्यापीठांतून आलेल्या विद्यार्थ्यांनी कॅंटीनमध्ये जाऊन कोल्हापुरी मिसळवर ताव मारला.

# तरुणाईच्या प्रतिभेचा संगम

## आंतरविद्यापीठ युवा महोत्सवातील स्पर्धांमध्ये रंगत; कलाविष्काराने घातली भुरळ

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

कार्टूनमधून कॅशलेस इंडियावर भाष्य..'कभी तकदीर का मातम, कभी दुनिया का गीला' यासारख्या अप्रतिम गझल, गीते...डिजिटल इंडिया, बेटी बचाओ, बेटी पढाओ, महिला सक्षमीकरण, ऊर्जा संपन्नता.. यासारख्या ज्वलंत विषयांवर आधारित सादरीकरणांतून विद्यार्थ्यांनी भविष्यातील भारत, एकात्मता, देशाच्या सर्वांगीण विकासाचा संदेश दिला. महोत्सवाच्या निमित्ताने देशभरातून आलेल्या विद्यापीठातील युवा कलाकाराच्या प्रतिभेचा संगम झाल्याचे दिसून आले. तरुणाईच्या कलाविष्काराने कोल्हापूरकरांना भुरळ घातली आहे.

सकाळच्या सत्रात सुगम संगीत (लाईट व्होकल) स्पर्धा झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठ, औरंगाबादच्या रोहन गावडेने 'जगत में देखी झुठी प्रीत' हे गीत सादर केले. एसएनडीटी महिला विद्यापीठ, मुंबईच्या दीप्ती रेगेने 'कभी तकदीर का मातम, कभी दुनिया का गीला' ही गजल पेश केली. बनारस हिंदू विश्वविद्यालयच्या राशीद कामिलने 'कभी आह लब में मचल गये, कभी अश्क आँखो से ढल गये'; युनिव्हर्सिटी ऑफ कालिकतच्या विंदूजा मॅननने 'आँखो का था कसूर न दिल का था कसूर' ही गझल सादर करून टाळ्यांची दाद मिळविली. डॉ. हीरसिंह गौर विद्यापीठ मध्य प्रदेशच्या दृश्यंत रूपारिलने 'हाय अफसोस मेरा कैसा मुकद्दर निकला', संत गाडगे बाबा विद्यापीठ, अमरावतीने 'मै तो सावरी नंदलाला' हे गीत सादर केले. वनस्पतीशास्त्र विभागातील निलांबरी सभागृहात वादविवाद स्पर्धा झाली. यात वनस्थळी विद्यापीठ, राजस्थानच्या विजया त्रिपाठी, अनुप्रिया पांडे, पंजाब युनिव्हर्सिटीचे अमृत कौर, परमजित कौर, अमृत विश्वविद्यालय, अमृतसरचे सलील सिंह, हरिणी श्रीवास्तव सहभागी झाले होते.







छाया : तय्यब अली

मानव्यशास्त्र इमारत सभागृहाच्या प्रांगणात इंस्टॉलेशन (बेस्ट ऑफ वेस्ट) 'स्वप्न' या विषयावर स्पर्धा झाली. गुलबर्गा युनिव्हर्सिटीच्या सुनील सागर, दिव्या श्रीमठ यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या स्वप्नातील 'मेक इन इंडिया, डिजिटल इंडिया, स्वच्छ भारत, बेटी बचाओ, बेटी पढाओ' चे स्वप्न पाहणारा तरुण साकारला. कॉटन युनिव्हर्सिटी आसामच्या विद्यार्थ्याने प्रदूषणाचे दुष्परिणाम सांगणारे व लव्हली प्रोफेशनल युनिव्हर्सिटीच्या जतीन सैनी याने 'विश्वशांती' संकल्पनेवर आधारित मॉडेल सादर केले. सेंट्रल

पान २ वर

# तरुणाईच्या प्रतिभेचा संगम

**(पान १ वरून)** युनिव्हर्सिटी राजस्थानच्या दिपांशू लाखन, मुनिष कुमारी यांनी विड पॉवर, सोलर पॅनल, हायड्रॉलिक पावर वापरून देशास ऊर्जासंपन्न बनविण्याचा संदेश दिला. अमृता युनिव्हर्सिटी, तमिळनाडूच्या रितेश यू याने देशातील महिलांना पडले सक्षमीकरणाचे स्वप्न या विषयावर मांडणी केली.

वि. स. खांडेकर भाषा भवन येथे सुरू असलेल्या स्पर्धेत आठ संघांनी एकांकिका सादर केल्या.

तमिळनाडूच्या अमृता विश्वविद्यालयाने 'व्यक्तिरेखा'; युनिव्हर्सिटी ऑफ केरळाने 'मृच्छकटिका' या मल्याळम् नाटिकेतून प्रेम आणि राजकारण यातील विरोधाभास दाखविला. आदिकवी ननैय्या युनिव्हर्सिटी आंध्र प्रदेशच्या संघाने देशात झालेले विविध घोटाळ्यांवर भाष्य करीत जागृती केली. त्यानंतर विद्यासागर युनिव्हर्सिटी, प.बंगाल; गुहाटी युनिव्हर्सिटी, राजस्थानने एकांकिका सादर केल्या.

## कार्टूनमधून 'कॅशलेस इंडिया'वर भाष्य...

मानव्यशास्त्र सभागृहात 'कॅशलेस इंडिया' विषयावर कार्टुनिंग स्पर्धा झाली. देशभरातील विद्यार्थ्यांनी कॅशलेस इंडियामुळे झालेले फायदे-तोटे आणि सर्वसामान्य नागरिकांना झालेल्या त्रासावर कार्टूनमधून भाष्य केले. झारखंडच्या रांची विश्वविद्यालयाच्या फोरिमाने 'अलाद्दीन का जीन'; मुंबई विद्यापीठाच्या केशर चोपडेकरने 'भविष्यातील भारत'; विश्वभारती विद्यापीठ प. बंगालच्या समिधा चौधरीने 'मोबाईल मनी वापरणारी फॅमिली'; इंद्रमला संगीत विश्वविद्यालय, केरळच्या प्रवीरसिंगने कॅशलेस इंडियामुळे सामान्य नागरिक व मध्यमवर्गीयांना झालेला त्रास कार्टूनमधून व्यक्त केला.



## सैनिक होण्याचे स्वप्न...

शिवाजी विद्यापीठात आंतर-विद्यापीठ युवा महोत्सव सुरू आहे. इन्स्टॉलेशन (वेस्टपासून बेस्ट) स्पर्धेत 'स्वप्न' या संकल्पनेवर आधारित सोलापूर विद्यापीठाच्या संघाने देशासाठी लढणारा सैनिक होण्याचे स्वप्न ओंकार साठे, संगमेश्वर बिराजदार, प्रदीप भद्रशेट्टी, विक्रांतसिंह चव्हाण या विद्यार्थ्यांनी प्रतिकृतीद्वारे मांडले. प्रत्येक जण डॉक्टर, इंजिनिअर, वकील होण्याचे स्वप्न पाहतो. मात्र ,सैनिक होण्याचे स्वप्न पाहणाऱ्या संघाचे प्रेक्षकांनी कौतुक केले.

# लोकसंगीतामुळे जल्लोषाला उधाण

## तरुणाई थिरकली : एकापेक्षा एक सरस सादरीकरण

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

बांबूच्या वाद्यांतून उमटणारी भेदक, पण लयबद्ध सुरावट...क्षणात उसळल्यासारखा आवाज करणारे पारंपरिक झांज...डफ, तबला, ढोल-ताशांचा दणदणाट आणि या पारंपरिक वाद्यांच्या संगीताची बरसात होताना त्याला साजेसे होणारे कलाकारांचे हावभाव आणि नृत्याविष्काराने शनिवारचा दिवस अक्षरश: गाजवला. शिवाजी विद्यापीठाच्या लोककला केंद्राच्या खुल्या सभागृहात सायंकाळी लोकसंगीत ऑर्केस्ट्रा या प्रकारचे सादरीकरण सायंकाळपासून झाले. एकापेक्षा एक सरस सादरीकरणाला उपस्थित रसिकांनी डोक्यांवर घेत जल्लोषी प्रतिसाद दिला. रात्री उशिरापर्यंत सुरू असलेल्या या जादुई संगीत उत्सवाचा आनंद उपस्थितांनी लुटला.

रंगीबेरंगी वेशभूषांतील महाराजा कृष्णकुमार सिंहजी या गुजरातच्या विद्यापीठाच्या कलाकारांनी सादर केलेल्या लोकसंगीताने सभागृहातील गर्दीला हालवून सोडले. वाद्यांच्या प्रचंड कडकडासोबत सादर करण्यात आलेल्या नृत्याविष्काराला उपस्थितांनी अस्सल कोल्हापुरी शिट्ट्या आणि टाळ्यांनी दाद दिली. आसामच्या तेजपूर विद्यापीठाच्या संघाने बांबूच्या वाद्यांचा चपखल वापर करत सादरीकरण केले. त्यांच्या अप्रतिम वेशभूषेची उपस्थितांकडून तारीफ सुरू होती. त्यांनी वाद्यांचे सादरीकरण करताना अनेक वेळा मानवी मनोऱ्यांचा वापर केल्याने रसिकांनी उभे राहून त्यांना दाद दिली. अमरावतीच्या संत गाडगेबाबा विद्यापीठाने या सादरीकरणाला एक वेगळीच श्रीमंती बहाल केली. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या लावणी आणि लोकसंगीताच्या जुगलबंदीला 'नाद खुळा' अशी रांगडी दाद मिळाली. लव्हली विद्यापीठाच्या पंजाबी लाऊड संगीताने तरुणाईला थिरकण्यास भाग पाडले. त्यामुळे रसिकांनीही जाग्यावरच बल्लेबल्लेचा आनंद लुटला.

आसामच्या गुवाहाटी विद्यापीठाने व्यासपीठावर लोकवाद्यांची कमानच रचली होती. अत्यंत कौशल्याने विद्यार्थी-विद्यार्थिनी हे वैशिष्ट्यपूर्ण संगीत वाजवून वातावरणात सुरांची उधळण करून गेले. सायंकाळी पाचच्या सुमारास सुरू झालेली ही लोकसंगीताची जल्लोषी मैफल रात्री उशिरापर्यंत सुरू होती. सुमारे साडेपाच तासांहून अधिक तास चाललेल्या या सादरीकरणाने आज यूथ फेस्टिव्हलच्या कार्यक्रमांमध्ये रंगत आणली.






३२ व्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ राष्ट्रीय युवा फेस्टिव्हल 'शिवोत्सव २०१७'मध्ये शनिवारी दुसऱ्या दिवशी आसामच्या गुवाहाटी विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी मानवी मनोरे आणि पारंपरिक वाद्यांनी शिवाजी विद्यापीठाचे लोककला केंद्र सभागृह दणाणून सोडले.



# भारतीय-पाश्चिमात्त्य संगीत सुरावटींची जादू

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

भारतीय आणि पाश्चात्य सुरावटींनी शनिवारचा दुसरा दिवस गाजवला. तरुणाईच्या दिलखेचक आविष्कारांमुळे शिवाजी विद्यापीठाच्या संपूर्ण परिसरात चैतन्य पसरले. ३२ व्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ राष्ट्रीय युवा महोत्सवाचे पहिल्या दिवशी शोभायात्रा आणि मान्यवरांच्या उपस्थितीत झालेल्या दिमाखदार उद्घाटन सोहळ्यानंतर आज प्रत्यक्ष महोत्सवातीलविविधस्पर्धांनासकाळी साडेनऊपासून सुरुवात झाली. आज दिवसभरात विद्यार्थ्यांनी पाश्चात्य गायन, शास्त्रीय वादन, एकांकिका, वक्तृत्व, पोस्टर मेकिंग, कोलाज आणि लोकसंगीत या कलाप्रकारांचे विद्यार्थ्यांनी सादरीकरण केले. या स्पर्धेचा अंतिम निकाल काहीही लागला तरी आज या देशभरातून आलेल्या कलाकार विद्यार्थ्यांनी उपस्थित रसिकांची मने जिंकली. कानपूर, पुणे, पश्चिम बंगाल, केरळ, बंगळुरू, वाराणसी, आणंद-गुजरात, नागालँड, मुंबई, नागपूर, अमरावती, अलिगड, अमृतसर आदी ठिकाणच्या विद्यापीठांच्या विद्यार्थ्यांनी अत्यंत आत्मविश्वासपूर्ण सादरीकरण केले. आजची तरुणाई शास्त्रीय संगीत ऐकत नाही, हा समजही आज खोडून काढल्याचे दिसून आले. कारण, या संगीत सादरीकरणासही मोठी गर्दी झाली.

# हमेशा मुस्कुराते रहो... 'किंग ऑफ ट्रॅजेडी' नाटकाचे दमदार सादरीकरण



चार्ली चॅप्लिनच्या प्रतीकात्मक पुतळ्यासोबत कलाकार अक्षय रावत.

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

विनोदी अभिनेता चार्ली चॅप्लिन याने वैयक्तिक आयुष्यात डोंगराएवढी अनेक दु:खे सोसून मूक अभिनयाद्वारे जगाला हसविले. आपल्या हसऱ्या मुखवट्यातून जीवनाच्या वेदनेचा सुक्ष्म वेध घेणाऱ्या या मनस्वी कलावंताच्या आयुष्याची कहाणी 'किंग ऑफ ट्रॅजेडी' या नाटकातून मांडण्यात आली. या नाटकाद्वारे 'मुस्कुराते रहो, मुस्करानेसे दु:ख दिखाई नही देता' हा संदेश नाटकातून देण्यात आला. निमित्त होते शिवाजी विद्यापीठात सुरू असलेल्या 'शिव महोत्सव' या ३२ व्या आंतरविद्यापीठ यूथ फेस्टिव्हलचे.

जगाला हसविणारा चार्ली चॅप्लिन याची कहाणी नाटकाद्वारे रंगमंचावर सादर करण्यात आली. त्याच्या जीवनाच्या प्रारंभीचा काळ अनेक खाचखळग्यांनी भरलेला होता. त्यावर मात करीत चार्ली मोठा कलाकार झाला. मनोरंजन क्षेत्रातील गायक, अभिनेता, फिल्म निर्देशक आदी अनेक शिखरे त्याने पादाक्रांत केली. या महान कलाकाराच्या आयुष्यातील प्रसंग चंडीगड विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी सादर केले. भाषा भवनमधील सभागृहात या नाटकाच्या सादरीकरणावेळी उपस्थितांचे मन हेलावून गेले. अक्षय रावतने चर्ली चॅप्लिनची भूमिका केली होती. चार्लीची आई हाना हिल यांची भूमिका रुबी चौहान हिने व पित्याची (स्पेन्सर चॅप्लिन यांची) भूमिका प्रयास दुबे याने केली. चार्लीच्या भावाची भूमिका शिवम शमनि केली. या नाटकात ९ कलाकार सहभागी झाले होते.

> गेली चार महिने आम्ही नाटकाची तयारी करीत होतो. ही भूमिका वठविण्यासाठी मी चार महिने चार्ली चॅप्लिनसारखे चालण्याचे प्रॅक्टिस करीत होतो. त्यावेळी मला अनेकदा मित्रांच्या चेष्टेला सामोरे जावे लागले.
>
> - अक्षय रावत

**नाटकासाठी १५ लाखांचा सेट**

नाटकाच्या सादरीकरणासाठी चंदीगडहून एक ट्रक साहित्य आणण्यात आले होते. नाटकाचा सेट तयार करण्यासाठी चंदीगड विद्यापीठाला सुमारे १५ लाख रुपये खर्च आला. यामध्ये चार्ली चॅप्लिनचे सहा पुतळे होते. याशिवाय कपडे व इतर बाबींचा खर्च वेगळा होता. यावरून या नाटकाची भव्यता दिसून येते.

## कोल्हापूर बोले तो 'झकास'

**कोल्हापूर :** 'यहाँ की हवा बहोत खुबसूरत है! मराठी खाना लाजवाब! यहाँ के लोग अतिथी का खूब सन्मान करते दिखते, कोल्हापूर बोले तो झकास!' असा सूर शनिवारी शिवाजी विद्यापीठात यूथ फेस्टिव्हलसाठी आलेल्या विविध विद्यापीठांतील विद्यार्थ्यांनी व्यक्त केला.

**महाराष्ट्रासारख्या सुविधा आम्हाला मिळाव्यात**

महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांना तुलनेने चांगल्या सुविधा मिळतात. आम्हालाही अशा सुविधा मिळाव्यात. आमच्या राज्यात विकास वेगाने होत आहे. तरुणाई विविध क्षेत्रांत चमकदार कामगिरी करत आहेत, असं मणिपूर विद्यापीठातील सीब्जीद सांगत होता. तर त्याच्या संघातील संगीत विभागाची विद्यार्थिनी धनमंजुरी म्हणाली, 'कोल्हापुरी जेवण आम्हाला आवडले.' विद्याराणी आणि मलेम या दोघांनीही मराठी जेवणाची स्तुती केली. यावेळी मणिपूर राजकारणाविषयी त्यांनी बोलताना सध्या आमच्या महिला आरक्षणाचा विषय तापला आहे; परंतु आम्हाला यामध्ये काही फारसे कळत नसल्याचे स्पष्ट केले.

- सीब्जीद (मणिपूर विद्यापीठ)

**कोल्हापुरी संस्कृतीच्या प्रेमात**

चंदीगड विद्यापीठाचा अक्षय म्हणाला, 'कोल्हापूरमध्ये कलेबद्दल खूप प्रेम दिसून आले. कारण, स्थानिक विद्यार्थी आम्हाला खूप सहकार्य करत आहेत. 'कोल्हापूर से आयी हूँ' हे गाणे यापूर्वी ऐकल्याने कोल्हापूरबद्दल उत्सुकता होती. कोल्हापुरी चप्पल खरेदी करूनच चंदीगडला जाणार आहे.' यावेळी कौशिक देवगण म्हणाले, 'कोल्हापुरी संस्कृती ही वेगळी वाटली; परंतु आम्ही सगळे जण या संस्कृतीच्या प्रेमात पडलो आहे.'

- अक्षय, कौशिक देवगण (चंदीगड विद्यापीठ)

**आम्ही खूप मेहनत घेतली**

'आम्ही वेशभूषा, मेकअप, पारंपरिक वाद्ये आणि चेहऱ्यावरील सुक्ष्म हावभावासाठी खूप मेहनत घेतली आहे. त्यामुळेच सुरुवातीपासून आमचा संघ वैशिष्ट्यपूर्ण सादरीकरणात चर्चेत राहिला आहे,' असे आशुतोया या विद्यार्थ्याने सांगितले. 'आसामची लोकसंस्कृती ही निसर्गाशी नाते सांगणारी असल्याने ती भावते,' असेही त्याने स्पष्ट केले.

-आशुतोया (गुवाहाटी विद्यापीठ )

**राजकारण युवकांच्या हाती**

पंजाबच्या लव्हली विद्यापीठाचा हर्षनसिंह म्हणाला, 'पंजाबमध्ये सध्या निवडणुकीची धामधूम आहे. ही निवडणूक युवकांनी हाती घेतली आहे. युवक हे परिवर्तनाचे प्रतीक आहेत,' आसाममधील राजकारण सध्या विकासात्मक दिशेने जात असल्याची माहिती आशुतोया याने सांगितली. मणिपूरच्या राजकारणात युवकांमुळेच विकासाचे वारे वाहू लागल्याचे स्पष्ट मत मलेम याने दिले.

-हर्षनसिंह, मलेम

**मराठी संस्कृती समजून घेता आली**

कोल्हापुरात होत असलेल्या या यूथ फेस्टिव्हलमध्ये मराठी संस्कृती समजावून घेता आली. आमची पंजाबी संस्कृती आणि मराठी संस्कृती यामधील बलस्थाने यानिमित्ताने दिसून आली. देशातील विविध संस्कृतींच्या माध्यमातून माणसे समजावून घेणे हाच उद्देश या यूथ फेस्टिव्हलचा असतो. तो सफल होत असल्याचे दिसते, असे मत पंजाब ॲग्रिकल्चरल युनिव्हर्सिटीचे मॅनेजर सतवीरसिंह यांनी व्यक्त केले.

- सतवीरसिंह ( मॅनेजर, पंजाब ॲग्रिकल्चरल युनिव्हर्सिटी)

**मराठी लोक मदतीस तत्पर**

पहिल्या दिवसापासून मला जाणवतेय, की मराठी लोक मदतीला तत्पर आहेत. हे हेल्पफुल आहेत. मला त्यांचा प्रामाणिकपणा विशेष भावला. माझा मोबाईल रजिस्ट्रेशन करताना तेथेच विसरला होता; पण मी चालत पुढे आलो असताना दुसऱ्या मिनिटाला पाठीमागून आलेले विद्यापीठाचे स्टाफ सचिन यादव यांनी मला मोबाईल आणून दिला. तसेच आमच्या एका मैत्रिणीची पर्स हरवली होती. तिला ती शोधून आणून देण्यात आली. त्यामुळे येथे घरात असल्यासारखे वाटत आहे.

- अमनप्रित कौर (पंजाब ॲग्रिकल्चरल युनिव्हर्सिटी)

# 'दंगल'ने लाईफ ही बदल दी..

## पंजाबच्या लव्हली प्रोफेशनल युनिव्हर्सिटीच्या नवोदित कलाकाराची भावना



**कोल्हापूर : प्रवीण मस्के**

'संघर्ष कर रहा हूँ, पहले कोई जानता नही था, दंगल फिल्म में काम करने के बाद पुरी लाईफ ही बदल गई है', अशा शब्दांत कुस्तीवर आधारित बहुचर्चित दंगल चित्रपटात भूमिका साकारलेल्या पंजाबच्या लव्हली प्रोफेशनल युनिव्हर्सिटीचा नवोदित चित्रपट कलाकार गिरीश भट याने भावना व्यक्त केली.

शिवाजी विद्यापीठात आंतरविद्यापीठ युवा महोत्सव सुरू आहे. देशाच्या वेगवेगळ्या प्रांतांमधून आलेले युवा कलाकार 'बेस्ट ऑफ बेस्ट' कलाविष्कार सादर करण्याचा प्रयत्न करीत आहेत. फगवाडा (पंजाब) येथील लव्हली प्रोफेशनल युनिव्हर्सिटीचा संघ सहभागी झाला आहे. युवा महोत्सवात सहभागी झालेल्या पंजाब युनिव्हर्सिटीमध्ये थिएटर अँड टेलिव्हजन अभ्यासक्रमाच्या दुसऱ्या वर्षाला शिकत असलेल्या गिरीश भट याने युवा महोत्सव ते चित्रपटापर्यंतच्या प्रवासाबद्दल सांगितले. दंगल चित्रपटात मिळालेल्या भूमिकेबद्दल बोलताना त्याने हा आयुष्यातील टर्निंग पाईंट असल्याचे सांगितले. पटियाला शहरात दंगल चित्रपटासाठी ऑडिशन सुरू होती. दिग्दर्शक नितीश तिवारी यांनी एक हजार कलाकारांमधून माझी निवड केली. सहा महिन्यांनंतर लुधियाना शहरात पाच दिवस शूटिंग चालले. या[…] मिळाले.

'दंगल'मध्ये [...] प्रदर्शित झाल्यानंत[र] [...] नाही, याबाबत म[...] चित्रपट प्रदर्शित [...] व्हिडीओ मोबाईल[...] बसला. आई-व[डील] [...] खूप आनंद झा[...] ठिकाणी तसेच वि[...] चित्रपटानंतर परिसर[...] लागले आहेत. अ[...] शांत स्वभावाचे अ[...]




# यूथ फेस्टिव्हल गावांमध्ये व्हावेत

## 'एआययू'चे एस. के. शर्मा यांचे मत



**कोल्हापूर : प्रतिनिधी**

देशातील विविध प्रांतांतील अस्सल संस्कृतीचे बहारदार सादरीकरण इंटरयुनिव्हर्सिटीच्या नॅशनल यूथ फेस्टिव्हलच्या माध्यमातून होते. विविधतेतून एकतेचे हे दर्शन गावागावांत साजरे करण्यासाठी असे फेस्टिव्हल गावांमध्ये आयोजित करायला हवेत, असे मत ऑल इंडियन युनिव्हर्सिटीजचे निरीक्षक एस. के. शर्मा यांनी दै. 'पुढारी'शी बोलताना व्यक्त केले.

निरीक्षक शर्मा म्हणाले, 'आपली संस्कृती ही सर्वश्रेष्ठ आहे. कारण, ती निसर्गाशी नाते सांगणारी उपजत आहे. सध्याच्या तरुणपीढीविषयी जे नकारात्मक बोलले जाते. ते मला मान्य नाही. कारण, आजची पीढी ही संवेदनशील, मेहनती आणि करिअरवर फोकस्ड असणारी दिसते. त्यांना पाठबळ द्यायला हवे. यूथ फेस्टिव्हलमधील स्पर्धक विद्यार्थ्यांकडून खूप चांगले सादरीकरण सुरू आहे. यामध्ये क्रमांक कोणाला द्यायचा, हा प्रश्न पडतो. सर्वांनाच क्रमांक द्यावा, असे कधी कधी वाटते, इतके अप्रतिम सादरीकरण विद्यार्थ्यांकडून होत आहे; पण स्पर्धा म्हटलं की कमी-जास्त असतेच.'

'शिवाजी विद्यापीठाने यूथ फेस्टिव्हलचे खूप सुंदर आयोजन केले आहे. त्यांना शंभरपैकी १२० टक्के गुण मी देईन,' असेही त्यांनी हसतहसत स्पष्ट केले. ते म्हणाले, 'आपली संस्कृती ही एकमेकांना जोडून ठेवणारी आहे. त्यामुळे या विद्यार्थ्यांचे सादरीकरण गावांमध्ये खुले व्हावे, यासाठी मी एआययूला प्रस्ताव दिला आहे. कारण, या कला लोकांपर्यंत आणि लोकांमध्ये जायला हव्यात. यातून आपला समाज अधिक घट्ट होईल, असे मला वाटते.' यावेळी शिवाजी विद्यापीठ प्रशासन व सर्व स्टाफ तसेच विद्यार्थी कल्याणचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव यांच्या आयोजनाची त्यांनी प्रशंसा केली.

हसतहसत स्पष्ट केले. ते म्हणाले, 'आपली संस्कृती ही एकमेकांना जोडून ठेवणारी आहे. त्यामुळे या विद्यार्थ्यांचे सादरीकरण गावांमध्ये खुले व्हावे, यासाठी मी एआययूला प्रस्ताव दिला आहे. कारण, या कला लोकांपर्यंत आणि लोकांमध्ये जायला हव्यात. यातून आपला समाज अधिक घट्ट होईल, असे मला वाटते.' यावेळी शिवाजी विद्यापीठ प्रशासन व सर्व स्टाफ तसेच विद्यार्थी कल्याणचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव यांच्या आयोजनाची त्यांनी प्रशंसा केली.

# 'दंगल'ने लाईफ ही बदल दी..

## पंजाबच्या लव्हली प्रोफेशनल युनिव्हर्सिटीच्या नवोदित कलाकाराची भावना



**कोल्हापूर : प्रवीण मस्के**

'संघर्ष कर रहा हूँ, पहले कोई जानता नही था, दंगल फिल्म में काम करने के बाद पुरी लाईफ ही बदल गई है', अशा शब्दांत कुस्तीवर आधारित बहुचर्चित दंगल चित्रपटात भूमिका साकारलेल्या पंजाबच्या लव्हली प्रोफेशनल युनिव्हर्सिटीचा नवोदित चित्रपट कलाकार गिरीश भट याने भावना व्यक्त केली.

शिवाजी विद्यापीठात आंतरविद्यापीठ युवा महोत्सव सुरू आहे. देशाच्या वेगवेगळ्या प्रांतांमधून आलेले युवा कलाकार 'बेस्ट ऑफ बेस्ट' कलाविष्कार सादर करण्याचा प्रयत्न करीत आहेत. फगवाडा (पंजाब) येथील लव्हली प्रोफेशनल युनिव्हर्सिटीचा संघ सहभागी झाला आहे. युवा महोत्सवात सहभागी झालेल्या पंजाब युनिव्हर्सिटीमध्ये थिएटर अँड टेलिव्हजन अभ्यासक्रमाच्या दुसऱ्या वर्षाला शिकत असलेल्या गिरीश भट याने युवा महोत्सव ते चित्रपटापर्यंतच्या प्रवासाबद्दल सांगितले. दंगल चित्रपटात मिळालेल्या भूमिकेबद्दल बोलताना त्याने हा आयुष्यातील टर्निंग पाईंट असल्याचे सांगितले. पटियाला शहरात दंगल चित्रपटासाठी ऑडिशन सुरू होती. दिग्दर्शक नितीश तिवारी यांनी एक हजार कलाकारांमधून माझी निवड केली. सहा महिन्यांनंतर लुधियाना शहरात पाच दिवस शूटिंग चालले. यातून बरंच काही शिकायला मिळाले.

'दंगल'मध्ये मिळालेली भूमिका चित्रपट प्रदर्शित झाल्यानंतर पाहण्यास मिळेल की नाही, याबाबत मनात शंका होती. मात्र, चित्रपट प्रदर्शित झाल्यानंतर मित्राने याचा व्हिडीओ मोबाईलवर पाठविल्यानंतर विश्वास बसला. आई-वडिलांसह नातेवाईकांना खूप आनंद झाला. शहरातील विविध ठिकाणी तसेच विद्यापीठात सत्कार झाला. चित्रपटानंतर परिसरातील लोक आता ओळखू लागले आहेत. अभिनेता आमीर खान फार शांत स्वभावाचे असून सेटवर काम करताना त्यांच्याकडून चांगल्या गोष्टी शिकायला मिळाल्या. प्रत्येक दृश्य चित्रीत करताना ते बारकाईने लक्ष ठेवत होते, असेही तो म्हणाला. यापूर्वी चार वेळा राष्ट्रीय युवा महोत्सवात लघुनाटिका व मूकनाट्य या कलाप्रकारात सहभागी झालो आहे. मकेअप, डायरेक्शन, लाईटिंगमध्येही प्रावीण्य संपादन केले आहे. आंतरविभागीय युवा महोत्सवात उत्कृष्ट अभिनेता म्हणून पारितोषिक मिळविले आहे. लवकरच 'रनिंग शादी डॉट काम' हा चित्रपट प्रदर्शित होत असून यात अभिनेत्री तापसी पन्नू समवेत काम करण्याची संधी मिळाली असल्याचे त्याने सांगितले.

# शिवोत्सवातून तरुणाई अभिव्यक्त

## मांडणी शिल्प, वादविवाद, गायनाच्या माध्यमातून वेधले देश प्रगतीकडे लक्ष

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठात सुरू असणाऱ्या ३२ व्या राष्ट्रीय युवामहोत्सव अर्थात शिवोत्सवाच्या तिसऱ्या दिवशी रविवारी तरुणाईच्या स्वप्नांचे प्रतिबिंब विविध कार्यक्रमांतून उमटले. मांडणी शिल्प, वादविवाद आणि भारतीय गायनाच्या माध्यमातून देशाच्या प्रगतीविषयीच्या भावना तरुणाईने मांडल्या.

असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीज नवी दिल्ली आणि शिवाजी विद्यापीठाच्या संयुक्त विद्यमाने शिवाजी विद्यापीठात ३२ वा राष्ट्रीय युवामहोत्सव सुरू आहे. महोत्सवाचा तिसरा दिवस तरुणाईच्या अभिव्यक्तीचा ठरला. सकाळी ९ वाजता लोककला केंद्रामध्ये वैयक्तिक भारतीय गायनाच्या, तर दुपारी २ वाजता सामूहिक भारतीय गायनाच्या स्पर्धा पार पडल्या. यामध्ये सहभागींनी आपापल्या प्रांतातील गाण्यांबरोबरच उपस्थितांची दाद मिळविणाऱ्या गझलसोबतच हिंदी चित्रपटांतील गीते सादर केली, तर भाषा भवन येथील सभागृहात एकांकिका स्पर्धा पार पडल्या. सायंकाळी ६ वाजता मूकनाट्यांच्या स्पर्धा येथे घेण्यात आल्या. आपल्या मूक अभिनयातून स्पर्धकांनी भावनांना वाट तर करून दिलीच, त्याचबरोबर विविध सामाजिक संदेशही श्रोत्यांना दिले. वनस्पतीशास्त्र विभागातील निलांबरी सभागृहात सकाळी ९.३० वाजता वादविवाद स्पर्धा घेण्यात आल्या. स्पर्धकांनी दिलेल्या ठरावीक वेळेत नोटाबंदीच्या केंद्र सरकारने घेतलेल्या निर्णयाबाबत चर्चा केली, तर याच सभागृहात दुपारी २ वाजता प्रश्नमंजूषा घेण्यात आली. सकाळी ९.३० वाजल्यापासून मानव्यशास्त्र विभागाजवळील रिकाम्या जागेत मांडणी शिल्पाची स्पर्धा घेण्यात आली. स्पर्धकांना 'माझे स्वप्न' या विषयावर शिल्पाची मांडणी करावयाची होती. विद्यार्थ्यांनी अगदी टाकाऊ साहित्यातून स्वतःतून आदर्श समाज व देशाविषयीच्या कल्पना या शिल्पातून मांडल्या. संगीतशास्त्र विभागामध्ये दुपारी ४ वाजता क्ले मॉडेलिंग व शास्त्रीय गायनाचा कार्यक्रम पार पडला.



**कोल्हापूर : लोककला केंद्रामध्ये सामूहिक भारतीय गीत सादर करताना उत्तर प्रदेश आग्रा येथील दयालबाग एज्युकेशन इन्स्टिट्यूटच्या विद्यार्थिनी.** (छाया : एस. अली)

### आजचे कार्यक्रम

- **सकाळी ९.३० वाजता स्कीट, स्थळ : भाषा भवन**
- **सकाळी ९.३० वाजता स्पॉट फोटोग्राफी व स्पॉट पेंटिंग, स्थळ : मानव्यशास्त्र विभाग इमारत**
- **सकाळी ९.३० रांगोळी स्पर्धा, स्थळ : संगीतशास्त्र विभाग**
- **सकाळी १० वाजता शास्त्रीय नृत्य, स्थळ : लोककला केंद्र**
- **दुपारी ३ वाजता लोकनृत्य, स्थळ : लोककला केंद्र**
- **सायंकाळी ५ वाजता मिमिक्री, स्थळ : भाषा भवन**

# नोटाबंदीच्या निर्णयाचे तरुणाईकडून स्वागत

## शिवोत्सवातील वादविवाद स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

देशाच्या स्वातंत्र्यानंतर सर्वसामान्य नागरिकांच्या भल्यासाठी घेण्यात आलेला सर्वात योग्य निर्णय म्हणून केंद्र सरकारने घेतलेल्या नोटाबंदीच्या निर्णयाचे एक बाजूला स्वागत करून समर्थन करण्यात आले, तर दुसऱ्या बाजूने या निर्णयाला कडाडून विरोध करीत तो गरिबांना अधिकाधिक गरिबीच्या खाईत लोटणारा आहे, असा प्रतिवाद करण्यात आला. योग्य संदर्भ, देशातील सामाजिक, राजकीय व आर्थिक परिस्थितीचे दाखले देत दोन्ही बाजू मांडल्या जात होत्या. श्रोतेही प्रत्येक मुद्द्यागणिक जोरदार टाळ्या वाजवून प्रतिसाद देत होते.



**कोल्हापूर : वादविवाद स्पर्धेमध्ये मत मांडताना केरळच्या महात्मा गांधी विद्यापीठाची विद्यार्थिनी.** ( सर्व छाया : एस. अली )

राष्ट्रीय युवामहोत्सवात वनस्पतीशास्त्र विभागाच्या निलांबरी सभागृहात वादविवाद स्पर्धा पार पडल्या. भारताच्या आर्थिक समृद्धीसाठी नोटाबंदी हा एकमेव उपाय हा वादविवाद स्पर्धेचा विषय होता. गेल्या तीन- साडेतीन महिन्यांपासून देशभरातील गरिबांपासून ते श्रीमंतांपर्यंत सर्वांना जिव्हाळ्याच्या असणाऱ्या या विषयावर तरुणाईनेही आपल्या खास शैलीत मते मांडली. अस्खलित हिंदीतून, तर काहींनी उत्तम इंग्रजीतून नोटाबंदीच्या निर्णयावर भावना मांडल्या. त्याला शेरोशायरीबरोबरच म्हणींचीही जोड देण्यात आली. तरुणाईकडे असलेल्या या सर्वव्यापी ज्ञानामुळे काही वेळा श्रोते अवाक् झाले, तर स्पर्धकांनी केलेल्या विनोदावर अनेकांच्या गालावर हसू फुटले.

स्वातंत्र्यानंतरच्या काळात काही निवडक कुटुंबांमध्येच लक्ष्मीचा वास होता. देश पारतंत्र्यामध्ये जाण्यापूर्वी सोन्याचा धूर निघत असे, तर स्वातंत्र्यानंतर गरिबांच्या चुलीतून धूर निघणे बंद होऊन संपत्ती फक्त श्रीमंतांकडे एकवटली; मात्र नोटाबंदीच्या निर्णयामुळेही काळे धन बाहेर आल्याचा युक्तिवाद समर्थकांनी केला, तर दुसरीकडे देशाच्या ग्रामीण भागात मोठ्या संख्येने राहणाऱ्या जनतेच्या रोजगारावर नोटाबंदीमुळे कुऱ्हाड कोसळल्याचे मत निर्णयाच्या विरोधकांनी व्यक्त केले. अत्यंत अभ्यासपूर्ण असणाऱ्या या वादविवादाला श्रोत्यांनी उत्स्फूर्त अशी टाळ्यांनी दाद दिली.



**कोल्हापूर : वैयक्तिक गायन सादर करताना डॉ. आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा विद्यार्थी रोहन गावडे व हिंदू विश्व विद्यालय बनारसचा विद्यार्थी श्री पांडे.**

## शिल्पातून मांडली 'माझी स्वप्ने'

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

भारत हा युवकांचा देश आहे. या युवावर्गाला देशाविषयी, समाजाविषयी आणि स्वतःविषयी काय वाटते याचे प्रतिबिंब शिवोत्सवात घेण्यात आलेल्या मांडणी शिल्पांच्या स्पर्धेतून प्रतिबिंबित झाले. आजची तरुणाई भोवताली सध्या जे सुरू आहे त्याच्यापेक्षा काही तरी चांगले करण्याचे स्वप्न पाहत आहे आणि ते करण्यासाठी आवश्यक जबाबदारी उचलण्याची तयारीही तरुणाईची आहे, असा संदेशच या मांडणी शिल्प स्पर्धेतून देण्यात आला.

मांडणी शिल्प हा तसा कलाकारांच्या कल्पनाशक्तीला आव्हान व चालना देणारा कलाप्रकार; मात्र स्पर्धेसाठी 'माझी स्वप्ने' असा विषय मिळाल्यानंतर तरुणाई कामाला लागली. मनामध्ये गेल्या कित्येक काळापासून दाबल्या गेलेल्या भावनांना वाट मोकळी करून देत अगदी आपली कल्पनाशक्ती पणाला लावत तरुणाईने आपली स्वप्ने मांडली. स्पर्धेचा विषय हा 'माझी स्वप्ने' असा असला तरी तरुणाईने आपल्या वैयक्तिक महत्त्वाकांक्षामध्ये न अडकता जगाचे, देशाचे व समाजाचे भविष्य मांडले.

यामध्ये विद्यार्थी व पालक डॉक्टर, इंजिनिअर, वकील बनण्याची स्वप्ने पाहतात; मात्र तरुणांनी सैन्यात जाऊन देशसेवा करण्याचे स्वप्न पाहिले पाहिजे, असा संदेश मांडणी शिल्पाच्या माध्यमातून सोलापूर विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी दिला, तर लव्हली प्रोफेशनल युनिव्हर्सिटी पंजाबच्या संघाने 'वादळात अडकलेला समाज व अशा परिस्थितीत ही नवी स्वप्ने पाहणारा सध्याचा तरुण' असे मांडणी शिल्प मांडले. राजस्थान विद्यापीठाच्या संघाने 'ग्रीन सोसायटी, क्लीन सोसायटी' ही संकल्पना मांडली, तर पंडित रविशंकर शुक्ल युनिव्हर्सिटी रायपूरच्या विद्यार्थ्यांनी तरुणाईच्या डोक्यामध्ये घोंघावत असणारे प्रश्न आणि त्याला मिळत असणाऱ्या ज्ञानरूपी रक्ताचा पुरवठा अशा संकल्पनेची मांडणी केली. इंदिरा गांधी कृषी विश्व विद्यालय रायपूरच्या संघाने विश्व शांततेचे स्वप्न मांडले. एस.एन.डी.टी.च्या स्पर्धकांनी टाकाऊ वस्तूपासून तरुणाईच्या स्वप्नांचा सप्तरंगी मोर तयार केला. तयार करण्यात आलेली सर्व मांडणी शिल्पे जवळपास टाकाऊ वस्तूपासून तयार करण्यात आली होती; मात्र यामधून समाजाला व देशाला पुढे घेऊन जाणारा टिकाऊ विचार मांडण्यात आला होता.



**कोल्हापूर : शिवोत्सवामध्ये मानव्यशास्त्र इमारतीनजीक घेण्यात आलेल्या मांडणी शिल्प स्पर्धेत आपली शिल्पे तयार करताना विद्यार्थी.**

## टूटकर भी मैंने प्यार किया

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

*इस कदर मैंने उसका ऐतबार किया*
*टूटकर भी मैंने उसको प्यार किया,*

अशा दर्दभऱ्या व मनाला व्याकूळ करणाऱ्या गझलांसह...

*'अवघे गर्जे पंढरपूर*
*चालला नामाचा गजर'*

अशा भजनांनी युवा गायकांनी रसिकांना तृप्त केले. आर्त स्वर, त्याला संगीताची जोड आणि श्रोत्यांनी वाहवा अशी दिलेली दाद यामुळे शिवाजी विद्यापीठाच्या लोककला केंद्रातील वातावरण मंत्रमुग्ध करून टाकणारे होते.

शिवाजी विद्यापीठात सुरू असणाऱ्या शिवोत्सव महोत्सवाच्या तिसऱ्या दिवशी रविवारी वैयक्तिक भारतीय गायन व सामूहिक भारतीय गायनाच्या स्पर्धा पार पडल्या. भरदुपारी बाहेर सूर्य तळपत असतानाही युवा गायकांच्या स्वरांनी सभागृहात मोठ्या संख्येने असणारा श्रोतावर्ग चिंब भिजून गेला होता. नेहमीच पाश्चात्त्यांचे अंधानुकरण करणारी पिढी म्हणून हिणवल्या जाणाऱ्या युवा पिढीने मर्मबंधांतील गीते सादर करून आपल्या संस्कृतीचे दर्शन घडविले. देशभरातून आलेल्या स्पर्धकांनी हिंदी व उर्दू गझल, मल्याळम गीते, हिंदी-मराठी चित्रपटांतील गीते तसेच सुरेल भजनांची मेजवानीच उपस्थितांना दिली.

पंजाब युनिव्हर्सिटीच्या विद्यार्थ्यांनी 'किया गया' आणि 'होली होली गुजरती' ही दोन पंजाबी गीते सादर केली, तर भारती विद्यापीठ पुणेच्या विद्यार्थ्यांनी पंडित जितेंद्र अभिषेकींचे 'अवघे गर्जे पंढरपूर चालला नामाचा गजर' हे भजन सादर केले. टाळ-मृदंगाच्या तालावर देशाच्या विविध राज्यांतून आलेले विद्यार्थीही आपसूकच डोलायला लागले, तर भजनानंतर सभागृहात विठूनामाचा नाद घुमला. पश्चिम बंगालच्या विद्यासागर विद्यापीठाच्या विद्यार्थ्याने गझल सादर केली, तर संस्कृत विद्यापीठ केरळच्या विद्यार्थ्यांनी मल्याळम गीत सादर केले.

तेजपूर युनिव्हर्सिटीच्या विद्यार्थ्यांनी हिंदी भजन सादर केले. एस.एन.डी.टी. वुमन्स युनिव्हर्सिटीच्या विद्यार्थिनीने 'ऐ मोहोब्बत मेरे' ही गझल सादर करून श्रोत्यांची वाह वाह मिळवली. 'अगर तलाश करू कोई मिल ही जायेगा, मगर तुम्हारी तरह कौन मुझे चाहेगा' ही दर्दभरी गझल गुरूनानक देव युनिव्हर्सिटीच्या विद्यार्थिनीने सादर करत वातावरण भारून टाकले.







**कोल्हापूर : एकांकिकेतील एका प्रसंगात अभिनय सादर करताना गुवाहाटी युनिव्हर्सिटी आसामचे कलाकार. दुसऱ्या छायाचित्रात मांडणी शिल्प आपल्या मोबाईल कॅमेऱ्यात कैद करताना तरुणी. तिसऱ्या छायाचित्रात स्पर्धेसाठी नोंदणी करताना विद्यार्थिनी.**



कोल्हापूर : 'शिवोत्सवा'त रविवारी इन्स्टॉलेशन प्रकारात पंजाबच्या लव्हली प्रोफेशन विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी बाटल्या, चप्पल, हातमोजे यांतून साकारलेली मांडणी.

# 'ड्रीमर्स' तरुणाईची स्वप्नभरारी!

## नैसर्गिक स्रोतांच्या संरक्षणावर टाकला नेमकेपणाने प्रकाश

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १२ : स्वप्नांच्या जगतात तरुणाईची कल्पनाशक्ती किती भन्नाट असू शकते, याचा प्रत्यय आज शिवोत्सवात आला. टाकाऊ कचऱ्यापासून विविध कलाकृतींच्या मांडणीतून त्यांनी वैविध्यपूर्ण संदेश देत विश्वशांती, स्वच्छ भारत, पर्यावरणीय समतोल, देशाचे संरक्षण, नैसर्गिक स्रोतांचे संरक्षण यावर नेमकेपणाने प्रकाश टाकला. एखाद्या विषयासंबंधी तरुणाई कशी वेगळ्या पद्धतीने व्यक्त होते, हे पाहून उपस्थितही अवाक्‌ झाले.

मांडणी (इन्स्टॉलेशन) प्रकारात सुमारे पंधरा विद्यापीठांनी सहभाग घेतला. 'माझे स्वप्न' या संकल्पनेभोवती त्यांनी



मांडणी केली. पंजाबच्या लव्हली प्रोफेशन विद्यापीठाने विश्वशांतीचा संदेश दिला. चप्पल, प्लास्टिक बाटल्या, फुटलेल्या काचा, पांढरे हातमोजे यांचा पुरेपूर वापर करत त्यांनी वैशिष्ट्यपूर्ण मांडणी केली. राजस्थानच्या केंद्रीय विद्यापीठाने 'ग्रीन सोसायटी, क्लीन सोसायटी'साठी काय करणे आवश्यक आहे, यासंबंधी भाष्य केले, तर झारखंडच्या रांची विद्यापीठाने शांतीप्रिय समाजासाठी कशाची गरज आहे, यावर नेमकेपणाने बोट ठेवले. त्यांनी कागदी कपांची वर्तुळाकार मांडणी केली होती. बुंदेलखंड विद्यापीठाने टाकाऊ वस्तूंमधून कुत्र्याच्या प्रतीकात्मक रूपातून जगाला स्वच्छ कसे ठेवता येईल, याचा विचार केला होता. गुलबर्गा विद्यापीठाने देशाच्या विकासासाठी शिक्षणाची आवश्यकता स्पष्ट केली होती. एका स्टडी रूममधून त्यांनी विषय हाताळला होता.

तिरुपतीच्या पद्मावती महिला विद्यापीठाने मल्टीनॅशनल कंपन्यांच्या अतिक्रमणातून देशातील नैसर्गिक स्रोतांवर काय परिणाम

**पान २ वर »**

# 'ड्रीमर्स' तरुणाईची स्वप्नभरारी!

» पान १ वरून

घडून येईल, दारिद्र्यात कशी वाढ होईल, याचे चित्र मांडले होते. विशेष म्हणजे मुंबईच्या एसएनडीटी विद्यापीठाने मोराच्या मांडणीतून देशाच्या 'वसुधैव कुटुंबकम्' संकल्पनेचे सुंदर चित्रण केले होते. जात, धर्म, वैविध्यपूर्ण संस्कृतीशी जोडलेला भारत देश भविष्यात जगात शक्तिमान कसा होईल, हा विचार त्यांनी मांडला होता. सोलापूर विद्यापीठाने देशाचे संरक्षण करण्यासाठी सरसावलेल्या पिढीसंबंधी टाकाऊ कचऱ्यातून मांडणी केली होती.

त्याचबरोबर तमिळनाडू, रायपूर, उत्तर प्रदेश, हरियाना, जम्मू व काश्मीर, आंध्र प्रदेश, कर्नाटक विद्यापीठाने आपापले विषय वैशिष्ट्यपूर्ण रीतीने मांडले होते.


शिवोत्सवातील बातम्या, फोटोफिचर व आणखी छायाचित्रांसाठी कोल्हापूर 'सकाळ'च्या www.facebook.com/Sakal Kolhapur या फेसबुक पेजला भेट द्या

सकाळ
कोल्हापूर, सोमवार
१३ फेब्रुवारी २०१७





कोल्हापूर : शिवोत्सवात रविवारी समूहगीत सादर करताना म्हैसूर विद्यापीठाच्या विद्यार्थिनी. २) लोकगीत सादर करताना पश्चिम बंगालच्या विद्यासागर विद्यापीठाचा संघ.




# मिले सूर मेरा तुम्हारा...!

## प्रादेशिक लोकगीतांनी धरायला लावला ठेका

कोल्हापूर, ता. १२ : तरुणाईच्या सळसळत्या उत्साहात शिवाजी विद्यापीठात रंगलेल्या शिवोत्सवात आज विविधतेने नटलेल्या भारतीय संस्कृतीचे दर्शन तरुणाईने घडवले. दुपारच्या सत्रात झालेल्या समूहगीत स्पर्धेच्या निमित्ताने तरुणाईने प्रादेशिक वेशभूषेसह आपापल्या बोलीभाषेतील लोकगीते सादर करताना साऱ्या लोककला केंद्राला ठेका धरायला लावले.

भारतीय समूहगीत या स्पर्धेत स्पर्धक विद्यापीठ संघांना एक देशभक्तिपर आणि प्रादेशिक लोकगीत सादर करणे बंधनकारक होते. अर्थात त्यासाठीची वैविध्यपूर्ण वेशभूषा, प्रादेशिक ताल व सूरवाद्यांचा सुरेख वापर आणि एकूणच प्रादेशिक वैशिष्ट्यांसह सादरीकरणाला विशेष महत्त्व होते. साहजिकच आपापल्या प्रदेशातील वेशभूषा परिधान करून हे सर्व संघ एकवटले आणि लोककला केंद्राला 'मिले सूर मेरा तुम्हारा तो सूर बने हमारा...' अशीच झालर लाभली.

आग्रा येथील दयालबाग विद्यापीठ, भगवंत विद्यापीठ (राजस्थान), विद्यासागर विद्यापीठ-मिदनापूर (पश्चिम बंगाल), म्हैसूर व धारवाड विद्यापीठ (कर्नाटक), एसएनडीटी महिला विद्यापीठ (मुंबई) आदी संघांनी दोन्ही गीत प्रकारांत बहारदार सादरीकरण केले. देशभक्तिपर गीतांतील विविध प्रादेशिक रचना आणि संगीतावरोबरच त्याचे सादरीकरण असो किंवा लोकगीतांतील विविध प्रादेशिक प्रवाह या साऱ्या गोष्टींची येथे आनंदानुभूती मिळालीच. त्याशिवाय भारतीय देशभक्ती व लोकगीतांच्या सप्रयोग अभ्यासाची ही एक कार्यशाळाच ठरली.



मानव्य विद्या विभागात व्यंग्यचित्र साकारताना विद्यार्थी चित्रकार.

### व्यंग्यचित्रातून 'कॅशलेस इंडिया'

**मानव्य विद्या विभागात दुपारच्या सत्रात व्यंग्यचित्र स्पर्धा रंगली. त्यातून विद्यार्थ्यांनी नुकताच झालेला नोटाबंदीनंतरचा प्रवास उलगडताना 'कॅशलेस इंडिया' या संकल्पनेवर मार्मिक भाष्य केले. घरातल्या लग्नकार्यापासून ते शेअर मार्केटपर्यंतच्या विविध विषयांवर आधारित व्यंग्यचित्रे तरुणाईने साकारली.**



तमिळनाडूच्या अमृता विद्यापीठाने सादर केलेल्या भागवतम् अच्युतम् एकांकिकेतील दृश्य.

# संवेदनशील मांडणीतून अभ्यासपूर्ण भाष्य

## एकांकिका, वादविवाद स्पर्धेतून दिसले यूथ टॅलेंट

कोल्हापूर, ता. १२ : मृत्यूनंतरचा प्रवास सांगणारे 'वेलकम', स्त्रीवरील अत्याचाराचे दर्शन घडविणारी 'और एक शकुंतला', मार्शल आर्टचा थरार दाखविणारे 'कासीन' व नेत्यांवर खुमासदार विडंबन करणाऱ्या एकांकिकेतून तरुणाईतील अफलातून ऊर्जा आज भाषाभवनमध्ये प्रकट झाली. तरुणाईने वादविवादातून त्यांच्यातील टॅलेंटही सिद्ध केले.

आसामच्या कॉटन कॉलेजने 'और एक शकुंतला'तून स्त्रीवरील अत्याचार कसा होतो, हे स्पष्ट केले. आसामी भाषेत सादर झालेल्या या एकांकिकेत कलाकारांचा अभिनय सरस ठरला. नागपूरच्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठाने 'वेलकम'मधून मृत्यूनंतरचा प्रवास मांडला. एका मुलीचे उद्ध्वस्त आयुष्य, तिची झालेली हत्या, तिला भेटलेला तरुण अन् पुढे त्या तरुणाचा झालेला अपघात, अशा जबरदस्त मांडणीत एकांकिका गुंफली होती. कलाकारांनी सहज अभिनयातून उपस्थितांचे लक्ष वेधले. आंध्र प्रदेश विद्यापीठाने 'संभवा' एकांकिकेतून सम्राट अशोककालीन जीवनाचे चित्र उभे केले. तमिळनाडूच्या अमृता विद्यापीठाने भागवतम् अच्युतम्, तर पश्चिम बंगालमधील विद्यासागर विद्यापीठाने नेत्यांवर विडंबनात्मक एकांकिका सादर केली. त्यास उपस्थितांनी टाळ्यांची दाद दिली. केरळ विद्यापीठाने आर्य राजा, केरळ संस्कृती व वैश्यांच्या जीवनावर आधारित एकांकिका सादर केली. आसामच्या गुवाहाटी विद्यापीठाने 'कासीन' एकांकिकेत चाळीस वाद्यांचा वापर करत मार्शल आर्टस्‌चा वापर केला. रोकडरहित व्यवहार हा भारतीय अर्थव्यवस्था भरभराटीस आणण्याचा एकमेव पर्याय आहे, या विषयावर नीलांबरी हॉलमध्ये वादविवाद स्पर्धा झाली. अभ्यासपूर्ण मांडणीतून या विषयावर झालेली मतमतांतरे उपस्थितांच्या बुद्धीला चालना देणारी ठरली.



कोल्हापूर : नागपूरच्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठाने सादर केलेल्या 'वेलकम' एकांकिकेतील एक प्रसंग.

## महोत्सवात आज

- ९ : ३०
  - स्कीट (भाषाभवन)
  - स्पॉट पेंटिंग, स्पॉट फोटोग्राफी (मानव्यशास्त्र इमारत)
  - रांगोळी (संगीत व नाट्यशास्त्र अधिविभाग)
- १० : ००
  - शास्त्रीय नृत्य (लोककला केंद्र)
- ३ : ००
  - लोकनृत्य व आदिवासी नृत्य (लोककला केंद्र)
- ५ : ००
  - मिमिक्री (भाषाभवन)



कोल्हापूर : क्ले मॉडेलिंगमध्ये दंग झालेला एक विद्यार्थी.

# क्ले मॉडेलिंग...

मानव्यशास्त्र इमारतीत झालेल्या 'क्ले मॉडिलिंग'मधून विविध क्षेत्रांतील 'संघर्ष' मांडण्यात आला. पंधरापैकी बारा विद्यापीठांच्या विद्यार्थ्यांनी नावीन्यपूर्ण कलाकृती तयार केल्या. त्यातून मानवी जीवनाचा, महिलांच्या विविध शृंखला तोडण्याचा, पर्यावरणातील समतोलाचा, पक्षी-प्राणी यांच्या अस्तित्वाचा, प्राण्यातील सत्तेचा संघर्ष कलाकृतींतून व्यतीत झाला.

कलाकारांनी एकाग्र होऊन या कलाकृती बनविण्यास सुरवात करताच इमारतीकडे विद्यार्थ्यांची पावले वळली. एकेक कलाकृती तयार होऊ लागल्यानंतर मानव्यशास्त्र इमारतीत गर्दी झाली. प्रत्येक कलाकृती कोणता आकार घेणार, याची उत्सुकता प्रत्येकाच्या चेहऱ्यावर होती. कोणता कलाकार कोणता विषय घेऊन कलाकृती सजवतोय, हे पाहण्यासाठी विद्यापीठ वर्तुळातील प्राध्यापक, कर्मचारी येथे आले होते. कलाकृतींनी आकार घेतल्यानंतर प्रत्येक जण विषयांचे गांभीर्य समजून घेत कलाकारांना दाद देत होते.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाने सादर केलेल्या 'सेनादल' विषयावरील मूकनाट्यातील एक दृश्य.**

# 'मूक' क्रिएटिव्हिटी !

कोल्हापूर, ता. १२ : देशातील पाण्याच्या समस्येपासून ते सर्जिकल स्ट्राइकपर्यंत... विविध विषय केवळ मुद्रा व कायिक अभिनयाद्वारे सादर करीत शिवोत्सवातील कलावंतांनी आज मूकनाट्ये सादर केली. या संवेदनशील 'मूक' क्रिएटिव्हिटीने शिवोत्सवाला चार चाँद लागले. १२ विद्यापीठांच्या ६० कलावंतांनी यात सहभाग घेतला.

काळ्या पांढऱ्या रंगाची वेशभूषा, पांढऱ्या रंगाने रंगविलेले चेहरे एवढीच रंग-वेशभूषा करून बहुतेक कलावंत मूकनाट्यात सहभागी झाले. पाण्यासाठी होणारी वणवण, पाणी संकलनासाठी होणारे प्रयत्न आणि शासकीय योजनांचा न मिळणार लाभ, त्याचे परिणाम, अशी विदारक स्थिती राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठाच्या कलावंतांनी उत्तम ताकदीने मांडले; तर गुहावटी विद्यापीठाच्या कलावंतांनी येथील रामायणातील 'सीता हरण'चा प्रसंग मुद्राभिनयाद्वारे सादर करीत नेमका आशय मांडला. कालिकत विद्यापीठाने 'ग्रेट अशोक' या विषयावर मूकनाट्य सादर करीत उपस्थितांना प्रेरणा दिली. मुंबईच्या एसएनडीटी विद्यापीठाने भारतीय संरक्षण दलाची सर्जिकल स्ट्राइक कामगिरी सादर केली.

# भाव, सुगम गायनाने रसिक मंत्रमुग्ध

## पंजाबी, मराठी, मल्याळी, छत्तीसगडी प्रादेशिक संगीताला दाद

**सकाळ वृत्तसेवा**



**सुगम संगीत सादर करताना गुवाहाटी विद्यापीठाचा विद्यार्थी.**

कोल्हापूर, ता. १२ : सुरेल आलाप, नटखट हरकतींचा संगम साधत प्रादेशिक भाषांतील भाव आणि सुगम संगीत सादर करतानाच संगीताची उत्तम जाण युवा कलाकारांनी दाखवून दिली.

तुडुंब भरलेल्या लोककला केंद्रात देशातील १६ विद्यापीठांच्या गायक-गायिकांनी केलेल्या गायनाला तितकीच तोलामोलाची दादही लाभली. पंजाब, केरळ, गुजरात, छत्तीसगड अशा देशाच्या चारही टोकांच्या विद्यापीठांतून आलेल्या कलावंतांची भाषा वेगळी; पण सगळीकडील संगीतातील 'सा'चा सूर तोच, ताल तोच. या संगीतातील एकात्मेची प्रचिती प्रत्येक सादरीकरणात आली.

पंजाब विद्यापीठाच्या विद्यार्थिनीने सुगम संगीत सादरीकणात 'तनहाई की राह' ही गझल सादर केली. तबला वादकाने वाजविलेला 'झप' भारदस्त होता. तसाच 'झप' केरळच्या संस्कृती विद्यापीठाच्या कलावंतानेही वाजविला. मल्ल्याळी 'मल्लहल्ली' अभंग वळणाचे गीत युवतीने सादर केले. भारती विद्यापीठाच्या विद्यार्थ्याने 'अवघे गरजे पंढरपूर' या अभंगाने भक्तिरसात डुंबवले. 'त्रिपुरा', 'एसएनडीटी', 'छत्तीसगड' विद्यापीठाच्या कलावंतांनी हिंदी भजन व गझल सादर केली. प्रत्येक शब्दाचा भावार्थ हळुवारपणे गायनातून उलगडला; तर साथसंगत करणाऱ्या तबल्याचा नटखट ठेका आणि हार्मोनियमच्या मंजूळ सुरावटींनी सादरीकरणातील नजाकत वाढविली. महोत्सवात संत मीराबाई, संत कबीर, संत तुकोबा अशा संतांच्या रचना जशा सादर झाल्या तशा 'ऐ दिल की दर्द', 'ये दिल की तनहाईयाँ' सांगणाऱ्या गझलाही सादर झाल्या.






कोल्हापूर : 'माझे स्वप्न' संकल्पनेंतर्गत मुंबईच्या एसएनडीटी विद्यापीठाने 'मोर' विषयावर आधारित भारतीय एकात्मतेची केलेली मांडणी. याशिवाय स्पर्धेत साकारलेल्या इतर कलाकृती.

(सर्व छायाचित्रे : संजय देसाई, बी. डी. चेचर)